TOI 7/12/05

# Prayas calls for disaster management bill

## Says states will have to ensure relief in advance

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Fresh from a study of flood-affected areas of the Konkan region, environment and development NGO Prayas has urged the government to bring a disaster management bill making progressive provisions towards minimising the potential damage by future natural disasters.

The government can bring the bill during the winter session, Subodh Wagle, head of Prayas' resources and livelihood unit, told TNN. He said the Centre had already taken an initiative in this regard, with the national-level bill pending before Parliament. And over a month ago, the state had declared to follow suit, he added.

"Normally, governments respond to disasters after they occur, but an enactment will legally bind states to ensure disaster mitigation steps in advance," he said.

Wagle pointed out that Maharashtra does have disaster management plans ready for every district, but they have not been updated nor were accessible to core groups like NGOs, who normally extend the first interface to the people in times of disaster.

The Prayas team, which studied the worst-hit areas of Konkan, concluded that the restoration of agricultural lands through the Employment Guarantee Scheme and public support; remedial action on sites with potential for fresh landslides; and food security were the three main concerns in the region.

Ram Kowligi, Sachin Waraghade and Pranjal Dixit were members of the team that visited the Konkan region.

**WHAT'S NEEDED**

- Restoration of agricultural land through EGS
- Activate food supply through PDS more effectively
- Remedial action on sites where landslides could occur
- Steps to check damage by future natural disasters


RELI

# Konkan suffers from after-deluge effects

EXPRESS NEWS SERVICE
NOVEMBER 29

MEMORIES of the July deluge and the ensuing landslides in Konkan may have started to wane, but according to a study by city-based NGO Prayas, the acute threat to food security may plague the region if the government does not expedite rebuilding. The study was conducted in Raigad and Ratnagiri districts.

According to the findings, the livelihood activities-based on local resources like agriculture, animal husbandry, fishing, wage labour have been severely affected due to destruction of natural resources. "Majority of the farmers will not be able to sow their next crop as huge tracts of land have been damaged. Moreover, agricultural lands have also affected by landslides," says Ramchandra Kowligi, senior research associate of Prayas. The study says there might be severe cases of malnutrition, increased fallback on taking loans which might ultimately lead to migration of the local population in search of livelihood.



An inundated crop field in Konkan

The State government, through two Government Regulations in September and October, had launched a comprehensive re-building programme of the region by using the Employment Guarantee Scheme (EGS). But the Prayas report alleges that the programme is yet to be implemented in full scale. "At the current rate, the rebuilding work will take more than two years and it might be too late by then," warns Kowligi.

The report also says the severity of the disaster has been magnified for the adivasis, dalits and women. Moreover, the report says the government response to the disaster have been grossly inadequate as it does not address the long-term effects on conduct of livelihood activities.

The Prayas report says excessive rains led to the natural disaster because of invasive encroachment for development into local ecology.

Indian Express - 30/11/05

२ १०

## प्रयास संस्थेचा अहवाल हिवाळी अधिवेशनात मांडणार

# शासनाचं आपत्ती व्यवस्थापन फोल

मुंबई/प्रतिनिधी

२६ जुलैला महाराष्ट्रावर जी अस्मान सुलतानी बरसली त्यात अवघा महाराष्ट्र जलमय झाला होता. या नैसर्गिक आपत्तीच्या काळात शासनानं केलेल्या आपत्ती व्यवस्थापनाचे पुरते तीनतेरा वाजलेत. पुण्याच्या प्रयास या नागरी समाज संस्थेनं प्रत्यक्ष पाहणी करुन जो अहवाल तयार केलाय त्या अहवालावरुनच हे स्पष्ट झालंय. आणि हा संपूर्ण अहवाल प्रयास येत्या हिवाळी अधिवेशनात मांडणार असल्याचं नुकतंच त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलंय. त्यामुळे येणारं हिवाळी अधिवेशन शासनाला बऱ्यापैकी अडचणीत आणण्याचं चित्र स्पष्ट झालंय. पत्रकार परिषदेत राम कौलगी, प्रांजळ दिक्षीत, सचिन वारघडे या प्रयासच्या कार्यकर्त्यांनी अहवाल सादर करुन प्रसिद्धी माध्यमांना या अहवालाला योग्य ती प्रसिद्धी देण्याचं आवाहन केलंय.

महाराष्ट्रभर २६ जुलैच्या पावसाने जे थैमान घातलं त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचं जनजीवन विस्कळीत झालं होतं. या आपत्तीच्या काळात महाराष्ट्र शासनानं आपत्ती व्यवस्थापनाच्या नावाखाली जो गाजावाजा केला होता. तो प्रयास या नागरी समाज संस्थेनं प्रत्यक्ष पाहणी करुन तयार केलेल्या अहवालामुळे फोल ठरलाय. शासनानं आपत्ती व्यवस्थापनाचं कार्य केवळ शहरी भागांमध्येच केलंय. २६ जुलैची आपत्ती अवघ्या महाराष्ट्रावर आली होती. त्यामुळे शासनाची यंत्रणा अपूरी पडली होती. परंतू तरीसुद्धा महाराष्ट्र शासन आपण आपत्ती व्यवस्थापनाचं कार्य यशस्वीरित्या पार पाडल्याचा दावा करतेय. हा दावा सपशेल चुकीचा आहे. कारण, आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यातुन कोकण विभाग आजही उपेक्षित राहिलाय. प्रयासने कोकण विभागातील रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यात प्रत्यक्ष पाहणी करुन या विषयावर एक अहवाल तयार केलाय. याच अहवालानुसार या दोन जिल्ह्यातील शेतीचं फार मोठया प्रमाणावर नुकसान झाल्याचं स्पष्ट झालंय. ही संपूर्ण शेती ग्रामीण भागातील असून, ती उपजिविकेची शेती या प्रकारात मोडणारी आहे. या शेतीच्या प्रकारातून शासनाला कोणतंच उत्पन्न मिळत नसल्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात शासनानं या शेती नुकसानीकडे पुरतं दुलक्ष केलंय. शासनानं नुकसान भरपाई दिली नसल्याने कोकणवासीय आता स्थलांतराकडे वळलेत. म्हणूनच शासनानं स्थानिक लोकांच्या सहभागानेच मदत कार्य करावं असं मत प्रयासच्या राम कौलगी यांनी नुकतंच आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत मांडल.

कोकणातील शेती करणारा वर्ग हा प्रामुख्याने दलित आणि आदिवासी वर्ग आहे. त्याचबरोबर पशूपालन हे देखिल या वर्गाचं उपजिविकेचं साधन आहे. एखादी कोबंडी, बकरी विकली तर पटकन पाचशे-हजार रुपये या लोकांना मिळतात असं प्रयासचे प्रांजळ दिक्षीत यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. यामुळे शासनानं पशूहानीमुळे झालेल्या नुकसान भरपाईकडेही दुर्लक्ष केलंय. या आपत्तीमुळे कोकणात मोठ्या प्रमाणावर चाऱ्याची समस्या निर्माण झालीय. सर्वत्र दरडी कोसळल्यानं कुठेच चारा मिळेनासा झालाय. म्हणूनच कोकणात दलित आणि आदिवासी वर्गाकडून बाहेरील कडब्याची मागणी जोर धरतेय. तसंच शासनानं हा विभाग पूरग्रस्त म्हणून घोषित केलाय. परंतु कोकणात अतिवृष्टीमुळेही बरचंस नुकसान झाल्याचं या अहवालातून स्पष्ट झालंय. तसंच प्रयासच्या 'कोकणातील अरिष्टावर उपाय स्थानिकांच्या नजरेतून या अहवालाचा अभ्यास केला असता, एक गोष्ट प्रामुख्यानं जाणवते, ती म्हणजे शासनाच्या आपत्ती व्यवस्थापनात स्त्रियांकडे पूर्णतः दूर्लक्ष करण्यात आलंय. अहवालात स्त्रियांच्या पूनर्वसनाची काही उदाहरणं देण्यात आली आहेत यावरुनच हे स्पष्ट होतंय. याच पत्रकार परिषदेत बोलताना प्रयासच्या सचिन वारघडे यांनी एक महत्वाचा मुद्दा प्रसारमाध्यमांसमोर आणलाय. महाराष्ट्र शासन ज्या कोकण रेल्वे प्रकल्पाचा अभिमान बाळगतेय. तो अभिमान पोकळ असल्याचा दावा सचिन वारघडे यांनी या अहवालामार्फत केलाय. शासनाला अभिमान वाटणारा 'कोकण रेल्वे प्रकल्प' आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टिने पुरता फोल ठरलाय. रेल्वे मार्गाच्या भराव टाकण्याच्या कामात शेत जमीनीच्या उताराचे आणि पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहांचे भान कोकण रेल्वेच्या उच्चशिक्षित अभियंत्याकडून राखलं गेलं नसल्याचं निष्पन्न झालंय. अहवालातील निवसर बागवाडीचं उदाहरणं हे शासनाच्या अशिक्षितपणाचा सबळ पुरावा आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यात मुंबईसाठी जशी चितळे समिती काम करतेय तशा प्रकारची कोणतीच समिती कोकणात काम करत नसल्याचंही उघड झालंय. आतापर्यंत शासनाने मदत कार्य एवढंच आपत्ती व्यवस्थापनाचं काम केलंय. आपत्ती येऊ नये यासाठी कोणत्याच उपाय योजनांची तरतूद शासनानं केलेली नाही. पुरग्रस्त आणि अतिवृष्टी यांच्यातील तफावत दाखवताना या अहवालात एक बोलकं उदाहरण देण्यात आलंय. ते म्हणजे, पाणी वरुन आलं तर पैसे नाही, पूर आला तरचं पैसे मिळतील, अशी उत्तरं स्थानिक तलाठ्यांनी लोकांना दिलीत. दरम्यान, 'कोकणातील आरिष्टावर उपाय स्थानिकांच्या नजरेतून ' या अहवालाचा अभ्यास केल्यावर हा संपूर्ण अभ्यास शंभर टक्के लोकांच्याच नजरेतून केल्याचं निश्चित होतं. त्यामुळेच प्रयास हा संपूर्ण अहवाल येत्या हिवाळी अधिवेशनात मांडणार असल्याने विरोधी पक्ष या अहवालाच्या माध्यमातून सरकारीची कोंडी करणार असल्याचं निश्चित झालंय.

रत्नभूमी २३/११/०५

# कोकणातला पूरग्रस्त अजून सावरलेलाच नाही!

## आघाडी सरकारच्या निष्क्रियतेचा 'प्रयास'कडून पर्दाफाश

रत्नागिरी, दि. २२ (प्रतिनिधी) - जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांत महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी व त्यामुळे आलेल्या पुराच्या तीव्रतेचा सर्वाधिक फटका मुंबईनंतर संपूर्ण कोकणाला बसला. मात्र कोकणातील अतिवृष्टीबाबत झालेली चर्चा व नुकसानभरपाई यात अभाव असल्याचे 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेने याविषयीच्या एका अहवालामध्ये म्हटले आहे.

कोकणातील प्रत्यक्ष सर्वेक्षणामधून प्रयास संस्थेला असे आढळून आले आहे की, अतिवृष्टीची झळ ज्यांना पोहोचली आहे अशा स्थानिक लोकांच्या गरजा आणि म्हणणेही नेहमीप्रमाणे कोणीही ऐकून घेतले नाही. परिणामी स्थानिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे जगण्याचे प्रश्नही शासनाच्या लेखी दुर्लक्षित राहण्याचा धोका असल्याचे मत संस्थेने व्यक्त केले आहे.

अतिवृष्टीतील मूळ कारणे, त्याचे विविधांगी परिणाम तसेच स्थानिकांच्या दृष्टीने शासनाचा प्रतिसाद, तातडीच्या तसेच दीर्घकालीन गरजा व अपेक्षा यांची सर्वंकष मांडणी करणारा अहवाल प्रयासने तयार केला आहे. तसेच या अहवालाची सीडीदेखील तयार करण्यात येऊन हा अहवाल शासनाला व लोकप्रतिनिधींना पाठविण्यात येणार आहे.

पुराचा जास्त परिणाम शेतीवर कशा पद्धतीने झाला, तसेच येथील लोकांना नेमके काय पाहिजे याचे स्पष्टीकरण अहवालात करण्यात आल्याचे राम कौलगी यांनी सांगितले. शासनाने या भागात पाणीपुरवठ्याबरोबर सर्वसामान्यांना स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करावे अशी मागणीदेखील अहवालाच्या माध्यमातून करण्यात आली आहे, असेही कौलगी यांनी सांगितले.

26 Nov. 2005 नवभारत

# नहीं मिली कोंकण के बाढ़ पीड़ितों को राहत

कार्यालय संवाददाता

मुंबई. 26 जुलाई की भयंकर बारिश की तबाही से कोंकण के आदिवासी दलित एवं किसान आज भी कठिन परिस्थितियों से गुजर रहे हैं. धान की फसल नष्ट होने के कारण खाने की चिंता एक भयंकर आपदा के रूप में सामने है. कोंकण के ग्रामिण लोगों के घर की व्यवस्था तक नहीं हो पाई है.

दुर्भाग्यपूर्ण है कि महाराष्ट्र सरकार ने कोंकणवासियों के लिए इस आपदा के समय में जो मदद की उचित व्यवस्था करने का आश्वासन दिया था, उसे वह अभी तक पूरा नहीं कर पायी है. ये विचार कोंकण जिले में आरोग्य, ऊर्जा, शिक्षा आदि क्षेत्र में विशेष रूप से प्रयत्नशील संस्था 'प्रयास' के सशक्त कार्यकर्ता रामचंद्र कवंगी के हैं, जो 25 नवंबर को 'मराठी पत्रकार संघ' में एक पत्रकार सम्मेलन में व्यक्त कर रहे थे. रामचंद्र कंवगी ने जानकारी दी की कोंकणवासियों के खाने, रहने, स्वास्थ्य आदि की कठिन समस्याओं के प्रति सरकार की लापरवाही को देखते हुए संस्था की तरफ से 'प्रयास' संस्था और कोंकण के आदिवासी, दलित और किसान संगठनों ने मिलकर पूरे जिले में व्यास आपदा का जायजा लेकर एक रिपोर्ट तैयार की है जिसे महाराष्ट्र सरकार के सामने पेश किया जायेगा ताकि महाराष्ट्र सरकार इसे गंभीरता से ले, चर्चा करे और जल्द से जल्द आपदा से निपटने की व्यवस्था करे. ज्ञात हो कि रिपोर्ट तैयार करने में संस्थाओं ने जिला स्तर के अधिकारियों, ग्रामसेवक, वीडियो आदि से सहयोग से तैयार की गयी है.

# आपत्कालीन तातडीच्या व दीर्घकालीन उपायांचा अहवाल शासनास सादर

रत्नागिरी (वार्ताहर) : कोकणात जुलै महिन्यात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीची झळ स्थानिकांना पोहोचली; परंतु स्थानिकांचे म्हणणे नेहमीप्रमाणे कोणीही ऐकून घेतले नाही. परिणामी, स्थानिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे जगण्याचे प्रश्नही शासनाच्या लेखी दुर्लक्षित राहण्याचा धोका आहे. स्थानिकांच्या दृष्टीतून शासनाचा प्रतिसाद, तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपायांबाबतच्या गरजा व अपेक्षा यांची सर्वंकष मांडणी करणारा एक अहवाल 'प्रयास'ने तयार केला असल्याची माहिती राम कवलगी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले की, एका बाजूने विकास प्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद मानवी आक्रमण व दुसऱ्या बाजूने अतिवृष्टीचा आघात यामुळे मुळातच नाजूक जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची कधीही भरून न येण्याजोगी हानी झाली. या नैसर्गिक व्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे व संसाधनांचे विविध प्रकारे नुकसान होऊन या नैसर्गिक आरीष्टांचे रूपांतर आर्थिक व सामाजिक आरीष्टांमध्ये झाले.

आदिवासी, दलित, स्त्रिया अशा आर्थिक-राजकीय पातळीवर परीघावर असणाऱ्या समाजघटकांना सर्व स्तरावरून सोसावा लागलेला अन्याय व उपेक्षेमुळे त्यांच्यासाठी आरीष्टाची तीव्रता अधिक वाढली. या आरीष्टामुळे अन्न सुरक्षेचा प्रश्न वंचितांसहित सर्व प्रभावित कुटुंबांसाठी गंभीर होणार आहे. शासनाने आरीष्टाला दिलेला प्रतिसाद मात्र अत्यंत अपुरा आणि तात्पुरत्या विचारावरच आधारित होता.

सर्वेक्षणाबाबत स्थानिकांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी तहसीलदार कार्यालयात एक विशेष कक्ष चालू करावा आणि त्यानुसार पुनर्सर्वेक्षणासाठी आदेश जारी करावेत, नुकसान झालेल्या शेतजमिनीचे सर्वेक्षण महसूल विभागाने करावे, शेतजमिनीच्या झालेल्या नुकसानीचा आराखडा लोकसहभागाने तयार करावा, जनावरांच्या विविध प्रकारच्या नुकसानाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करून त्याकरिता वेगळी नुकसानभरपाई द्यायला हवी, मजुरीच्या प्रश्नांची तीव्रता कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे आवश्यक आहे. अतिवृष्टीचे रूपांतर पुराच्या आरीष्टात होण्यामागे असणाऱ्या मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांचा साकल्याने अभ्यास करून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

यासाठी शासनाने मुंबईसाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धर्तीवर कोकणासाठी व्यापक कार्यकक्ष असणारी बहुशास्त्रीय व लोकसहभागी पद्धतीने अभ्यास करणारी स्वतंत्र समिती नेमावी आणि उपाययोजनांबाबत शिफारशी शासनाकडे 'प्रयास'ने केल्या आहेत. यावेळी 'प्रयास'चे सचिन बारगडे, प्रांजळ दीक्षित, संदीप लिंगायत, अमित असनीकर आदी उपस्थित होते.

महाभारत २३।११।०५

# 'आपद्ग्रस्त आदिवासींसाठी हिवाळी अधिवेशनात तरतूद व्हावी'

**रत्नागिरी / प्रतिनिधी ■**

अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाची भरपाई देताना शहरी भागांचा विचार जेवढ्या तीव्रतेने झाला, तेवढा ग्रामीण भागाचा झाला नाही. त्यामुळे आदिवासी, दलित यांच्यासारख्या वंचित वर्गाला नुकसान भरपाई मिळालीच नाही. त्यांच्यासाठी किमान हिवाळी अधिवेशनात तरी काही ना काही तरतूद व्हावी, यासाठी पुण्याच्या प्रयास संस्थेने आवाज उठवला आहे.

नेमक्या किती लोकांना या भरपाईचा लाभ मिळाला आणि नेमके कोण यापासून वंचित राहिले याची माहिती घेण्यासाठी 'प्रयास'च्या संसाधने आणि उपजीविका गटाने विशेष सर्वेक्षण केले. हे सर्वेक्षण करण्यामागे आपत्ती ओढवण्यामागची कारणे शोधणे आणि त्यावरील पर्यायांचा विचार करणे हा मुख्य हेतू होता. या संस्थेचे राम कलवई, सचिन वारगडे, संदीप लिंगायत, अमित असनीकर यांनी मंगळवारी एक पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. या सर्वेक्षणाच्या अहवालाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले.

अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान शेतीचे झाले आहे. शेतांची दुरुस्ती हा सध्या शेतकऱ्यांसमोरील मोठा प्रश्न आहे. त्याकरिता रोजगार हमी योजनेतून निधी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र त्याच्या अटी अतिशय जाचक आहेत. त्या अटींचे पालन केल्यानंतर जर मदत दिली जाणार असेल तर त्याला दोन वर्षे लागतील, असा आक्षेप घेण्यात आला. नुकसानाचा प्रस्ताव शेतकऱ्यांकडूनच घेतला जावा, त्याच्या निधी वितरणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे दिली जावी, प्रतिगुंठा १५०ऐवजी ४०० ते ५०० रु. इतकी मदत दिली जावी, असे पर्याय 'प्रयास'तर्फे देण्यात आले आहेत.

वाहून गेलेल्या गुरांचा विचार करताना सरकारने अतिवृष्टीमुळे विविध रोगांचे बळी ठरलेल्या गुरांचा विचार केलेला नाही. त्याचा विचार करून ती भरपाईही शेतकऱ्यांना दिली जावी, ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवा अधिक कार्यक्षम करावी, अशा मागण्या 'प्रयास'ने केल्या आहेत.

जलस्वराज्य योजनेवर अफाट खर्च करणाऱ्या सरकारने अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या नळपाणी योजनांकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. भातपीक हातचे गेल्यामुळे जसे शेतकऱ्याचे नुकसान झाले तसेच तळागाळातील बाकी समाजांचेही झाले. पण त्यांच्याकडे सरकारने लक्ष दिले नाही. त्यांच्या नुकसानाचा आणि भरपाई देण्याचा विचारच झाला नाही, असे आपल्याला सर्वेक्षणात दिसल्याचे यावेळी सांगण्यात आले. स्थानिक आमदारांनी हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न मांडावा, अशी मागणी 'प्रयास'ने केली आहे.

१८ डिसेंबर २००५

# चिपळुणात सोमवारी 'कोकणातील पूर'

*चिपळूण (म. टा. वृत्तसेवा)* : 'प्रयास' या पुण्याच्या सेवाभावी संस्थेतर्फे रत्नागिरीच्या गोगटे जोगळेकर कॉलेजात सोमवार, १९ डिसेंबर रोजी 'कोकणातील पूर' या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यशाळेत मुंबई, पुणे, रायगड, रत्नागिरी येथील अनेक मान्यवर प्राध्यापक सहभागी होणार आहेत.

कार्यशाळेला तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार असून संस्थेने तयार केलेल्या अहवालावर चर्चासत्रही पार पडणार आहे. कोकणातील जागरूक रहिवासी व अभ्यासकांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

रत्नागिरी टाईम्स . २५/११/०५ पान-७

# बाह्यहस्तक्षेपामुळे कोकणातील पारंपारीक उपजिवीका पध्दतीवर संकट, 'प्रयास'चा अहवाल

रत्नागिरी,२४ नोव्हे.(वार्ताहर)- कोकण रेल्वे, खाणकाम आदिंसारखे आधुनिक विकासाच्या नावाने केले जाणारे बाह्यहस्तक्षेप आणि कोकणातील नैसर्गीक परिस्थितीच्या मर्यादा धुडकावून केले जाणारे प्रकल्प यामुळे शेती, मच्छिमारी, जंगलाधारीत व्यवसाय या पारंपारीक उपजिवीका पध्दतीवर मोठे संकट येत असून नैसर्गीक आपत्तीमुळे कोकणवासीयांच्या उपजिविकेची सुरक्षितताच अनिश्चित काळासाठी धोक्यात आली असल्याचे पुण्यातील 'प्रयास' संस्थेने प्रसिध्द केलेल्या अहवालात प्रामुख्याने स्पष्ट करण्यात आले आहे.

जुलै व ऑगस्ट महिन्यातील पुर व अतिवृष्टीने घडविलेले नुकसान आणि त्यांचे विविधांगी परिणाम लोकांच्या दृष्टीकोनातुन समजून घेणे व शासनाच्या तत्कालीन, दिर्घकालीन उपाययोजनांबाबत लोकांचे अनुभव व अपेक्षा जाणून घेणे या उद्देशाने प्रयास या स्वयंसेवी संस्थेच्या अभ्यास गटाने पाहणी करुन तयार केलेला अहवाल आज येथे पत्रकार परिषद घेवून प्रसिध्द करण्यात आला. हा अहवाल रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पेण, रोहा, माणगांव, चिपळून, गुहागर व संगमेश्वर या आठ तालुक्यातील ४७ वाड्यांमध्ये केलेल्या क्षेत्र पाहणीवर आधारीत आहे.

कोकणासारख्या दुर्गम व नाजुक नैसर्गीक रचना असलेल्या प्रदेशात कोकणच्या विकासासाठी सुरु झालेल्या कोकण रेल्वेचा स्थानिक लोकांना फारसा फायदा झाला नाही. उलट घरांना, जमीनींना भेगा जाणे, आदि समस्यांना सामोरे जावे लागल्याचे निवसर बाग येथील घटनांमधून स्पष्ट झाले आहे. फार्म हाऊस, कंत्राटी शेती, रिसॉर्टस, हॉटेल्स तसेच कारखानदारीच्या नावाखाली शहरी भांडवलदार व श्रीमंत वर्गाकडून कोकणातील जमीनी हस्तगत करण्याचे प्रमाण मोठे आहे. मच्छिमारीमध्ये बड्या व्यावसायीकांमुळे स्थानिक छोट्या मच्छिमारांवर संकट येत आहे. यामुळे प्रचंड नैसर्गीक साधनसंपत्ती असुनदेखील कोकणातील बहुसंख्य लोकांपुढे जगण्याचा प्रश्न तीव्र बनला असून येथील अर्थव्यवस्थेलाच धक्का बसल्याचे अहवालात नमुद केले आहे.

अतिवृष्टी व दरडी कोसळल्यामुळे ज्या शेतजमीनीत मोठमोठे दगडधोंडे आणि गाळ यांचा एक-दीड फुटापेक्षा जास्त उंचीचा थर साठला आहे तेथे बाहेरुन यंत्रसामुग्री, आर्थिक मदत मिळाली तरी पुढील अनेक हंगाम जमीनी पुर्वस्थितीत येणार नाहीत. या शेतजमीनींची दुरुस्ती लोकसहभागाशिवाय शक्य नाही असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

भविष्यात गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न उभा राहणार आहे. आधीच अशक्त व रोगट झालेल्या गुरांवर याचा तीव्र परिणाम जाणवेल. पावसाळ्यात जरी पिण्याच्या किंवा शेतीच्या पाण्याची वणवण जाणवत नसली तरीही हिवाळ्याच्या शेवटी याची तीव्र समस्या लोकांसमोर उभी राहील. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची तिव्रता आर्थिक व सामाजीकदृष्ट्या दुर्बल अशा दलितांसाठी अनेक पटींनी वाढल्याचे दिसते. शेतमजुरी अभावी भुमिहीन दलितांच्या उपजिवीकेचा प्रश्नही यापुढे तीव्र होणारअसल्याची भिती या अहवालाव्दारे व्यक्त करण्यात आली आहे.

बेसुमार जंगलतोड, रासायनीक कारखाने, पुरेषेत व पात्रात होणारी बांधकामे, झाडेझुडपे व गवताळ प्रदेशात दरवर्षी लागणारे वणवे यातुन मानवाने निसर्गावर केलेले बेबंद आक्रमण हा कोकणातील नैसर्गीक अरिष्टाला जबाबदार घटक ठरल्याचे अहवालात म्हटले आहे. या सर्व बाबींबवर अहवालात काही उपायही सुचविण्यात आले आहेत. याबाबत माहिती देताना 'प्रयास' चे राम कवलगी यांनी सांगितले की, अरिष्टाचा शेतीवर मोठा परिणाम आला आहे.

मात्र भातशेतीच्या नुकसानीला अत्यल्प मदत दिली जाते. याबाबतचे सर्वाधिकार कृषी विभागाला देण्यात आले आहेत. कामाची व्याप्ती पाहता मनुष्यबळ कमी पडते हे लक्षात घेवून यात लोकसहभाग महत्वाचा आहे. आपत्कालीन परिस्थितीत जशी कामे होतात तशी व्हायला हवीत. शेतीच्या दुरुस्तीसाठी प्रथम २५ टक्के व नंतर ७५ टक्के रकम दिली जाणार आहे. कोकणातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पाहता या कामाचे पैसे आगावू दिले जावेत ही कामे ३१ डिसेंबर २००५ पुर्वी पुर्ण करण्याचे शासन आदेश असताना त्याकामाला अद्याप सुरुवात झाल्याचे दिसत नाही असेही त्यांनी सांगितले.

स्थानिक लोकांकडे कोकणातील नैसर्गीक, भौगोलीक, सामाजीक परिस्थितीचे ज्ञान आहे त्याचा वापर करुन व्यापक स्वरुपात अभ्यास व्हायला हवा. त्यासाठी लोकसहभाग असलेली खास समिती नेमण्यात यावी येथे विकासकामे योग्य ते निकष पाहुनच केली जावीत. ढगफुटीचे मोजमाप करण्याची यंत्रणा कोकणात नाही ती उपलब्ध व्हावी तसेच विकासकामामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज त्यांनी नमुद केली.

आपत्ती निवारणाचा अभियांत्रीकी दृष्टीकोनातुन विचार होतोय त्याला नैसर्गीक व जैविक विचारांची जोड हवी. राष्ट्रीय पातळीवर नैसर्गीक आपत्ती विधेयक संसदेत येत आहे. याबाबत समाधान व्यक्त करुन महाराष्ट्र सरकारनेही असे विधेयक विधिमंडळात आणावे अशी मागणी त्यांनी केली.

# अतिवृष्टीतील आपदग्रस्तांना आधाराचा 'प्रयास'

रत्नागिरी/वार्ताहर

प्रयास या संस्थेने कोकणातील अतिवृष्टीच्या अरिष्ठावरील अहवाल सादर केला असून या अहवालात अतिवृष्टीतील आपद्ग्रस्तांच्या मागण्यांचा समावेश केला आहे. अपाद्ग्रस्तांसाठी अधिका अधिक मदत मिळावी यासाठी संस्था कार्यरत आहे. या परिषदेत राम कौतुके यांनी माहिती दिली.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. बांध फुटले, ठिकठिकाणच्या दरडी कोसळल्या, सुपीक जमिनिची धूप झाली या अशाच अन्य कारणांमुळे पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाली. शासनाने त्यांना आर्थिक मदत जरूर केली परंतु ती झालेल्या नुकसानाची भरपाई होण्यास कमी पडली. प्रयास न सादर केलेल्या अहवालात पुर्नवसन करण्याची मागणी तसेच पडीक जमिन खरेदी करुन जागा उपलब्ध करुन देण्याची मागणीचा समावेश करण्यात आला आहे. या मधून निर्माण होणारे स्त्रीयांचे प्रश्न यांचा मोठ्या प्रमाणावर विचार होणे आवश्यक आहे. यासाठी समितीही नेमण्यात यावी असे त्यांनी यावेळी सांगितले.

पुरग्रस्त भागातील अशिक्षित शेतकऱ्याला लिहिता वाचता येत नाही त्याच प्रमाणे तो कोणत्या कार्यालयाकडे अर्ज करु शकत नाही. यासाठी शासनाने त्यांच्या दारापर्यंत जाऊन त्यांना मदतीचा हात देणे गरजेचे आहे.

अतिवृष्टी व पुरामुळे शेतजमिनिचे, पिकांचे तसेच प्राणी जीवनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे संपूर्ण शेतजमिन नष्ट झाली. नष्ट झालेल्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजुरांच्या उपजिविकावर यामुळे मोठा आघात झाला. यासारख्या घटनांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी धोकादायक ठिकाणांची यादी होणे गरजेचे आहे. तसेच या मध्ये लोकांचा सहभाग महत्वाचा आहे. त्याला प्रशिक्षणाची जोड आवश्यक असल्याचे यावेळी सांगितले. या कार्यक्रमाला सचिन वारघडे, प्रांजळ दिक्षित, संदिप लिंगायत, अमित अस्नेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

लोकसत्ता ८/१२/०५

# 'नैसर्गिक प्रदेशाचा विकास करताना निव्वळ अभियांत्रिकी उपाय नकोत'

**पुणे, ७ डिसेंबर /प्रतिनिधी**

कोकणासारख्या नैसर्गिक वैविध्य लाभलेल्या प्रदेशाचा विकास करताना निव्वळ अभियांत्रिकी उपायांचा अवलंब न करता तेथील नैसर्गिक व्यवस्थेला धोका पोहोचणार नाही, असे नेमके आणि ठोस निकष विकसीत करण्याची आवश्यकता आहे, असा निष्कर्ष 'प्रयास'तर्फे सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आला.

जुलै आणि ऑगस्ट महिन्यात कोकणात झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे झालेल्या नुकसानीचा सखोल अभ्यास प्रयासच्या संसाधने आणि उपजीविका गटातर्फे नुकताच करण्यात आला. संस्थेने कोकणात केलेल्या या अभ्यासीचा अहवाल तयार केला आहे. तसेच, शासनाला काही शिफारशीही केल्या आहेत. संस्थेचे सुबोध वागळे, राम कवलगी आणि सचिन वारघडे यांनी आज पत्रकार परिषदेत या अहवालाची माहिती दिली.

या संदर्भात माहिती देताना वागळे यांनी सांगितले की, अतिवृष्टीचा फटका संपूर्ण राज्यालाच बसला. मात्र, मुंबईतील नुकसानीची व त्याबाबतच्या दीर्घकालीन योजनांबाबत गांभीर्याने विचार झाला. कोकणातली नुकसानीचा मात्र तेवढा विचार झाला नाही. या अतिवृष्टीमध्ये कोकणातील सामान्य जनेतेचे प्रचंड नुकसान झाले आहे. पिके, घरे, गुरे आणि अन्नसाठ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. चारा टंचाईचा प्रश्नही भविष्यात उग्र रूप धारण करण्याची शक्यता आहे. शासनाने तात्पुरत्या उपाययोजना केल्या आहेत. मात्र, त्या अपुऱ्या असल्याने त्याबाबत दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता आहे.

म.टा. 3/9/2005

# कोकणातील पुराचा अहवाल 'प्रयास'तर्फे सरकारला सादर

**पुणे ( म. टा. प्रतिनिधी ) :** 'कोकणात झालेली अतिवृष्टी, महापुराचे अरिष्ट आणि त्यावरील उपाय' या संदर्भात प्रयास संस्थेने तयार केलेला अहवाल राज्य सरकार, राज्यातील आमदार आणि खासदारांना सादर केला असल्याचे संस्थेचे विश्वस्त सुबोध वागळे यांनी सांगितले.

कोकणातील पूरग्रस्तांना तातडीची मदत पोचवताना कोठे भ्रष्टाचार झाला यांची चौकशी करून संबधितांवर तातडीने कारवाई करावी, कोकणातील ज्या पूरग्रस्त भागामध्ये अद्याप मदत पोचलेली नाही अशा ठिकाणी मदत पोचवण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, पूरग्रस्तांच्या स्थानिक तक्रारी नोंदवण्यासाठी तहसीलदार कार्यालयामध्ये एक स्वतंत्र कक्ष सुरू करावा, मदत पोचवण्यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता समिती नेमण्यासंदर्भात विचार व्हावा, महसूल विभागाने नुकसान झालेल्या शेतजमिनींचे पुनर्सर्वेक्षण करून हद्द निशाण्या आखाव्यात अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

अशा आपत्तींचा सामना करण्यासाठी मानवनिर्मित आणि नैसर्गिक कारणांचा अभ्यास करून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबवण्यात यावा, कोकणातील विकास कामे आणि त्यासाठी पूरक उद्योग यांच्यासाठी नेमके निकष तातडीने तयार करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा उभी करावी आणि आपत्ती प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या खात्यांमध्ये जैविक उपायांच्या विकासासाठी स्वतंत्र जैव अभियांत्रिकी विभाग सरू केला जावा अशी मागणी करण्यात आल्याचे वागळे यांनी स्पष्ट केले.

म.टा. ३१/७/०५

# कोकणातील पूरग्रस्तांबद्दल सरकार उदासीन!

*मुंबई ( म. टा. प्रतिनिधी ) :* मुंबई वगळता कोकणातील उर्वरित चार जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीच्या तडाख्याने ४११ जणांचे बळी घेतले असून, त्या भागातील ११ लाख ८३ हजार ७५७ हेक्टर शेतजमिनीचे मोठे नुकसान झाले. मात्र या पूरग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यात सरकार स्वारस्य दाखवत नसल्याचे 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या पाहणीत दिसून आले आहे.

सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांच्या तुलनेत रायगड आणि ठाणे जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, सरकारी पंचनाम्यानुसार ५० टक्क्यांहून अधिक नुकसान झालेल्या शेतीचे प्रमाण आठ लाख दोन हजार १८३ हेक्टर आहे. अतिवृष्टीने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पशुधन आणि कोंबड्या गमवाव्या लागल्या. त्याची सरकारी पातळीवर नोंद झालेलीच नाही. या भागातील आदिवासी आणि उपेक्षित कुटुंबांना ऐनवेळी हक्काची आर्थिक सोय करून देणाऱ्या पशुधनाकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे 'प्रयास'चे म्हणणे आहे.

रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांतील सहा हजार ९१ गावांतील अतिवृष्टीत बळी पडलेल्या जवळच्या नातेवाईकांना सरकारने चार कोटी ४० लाख रुपयांची रोख मदत दिली आहे. तात्काळ मदत २७ लाख ७२ हजार ६१८ व्यक्तींना देण्यात आली आहे. तातडीची मदत मिळाली असली तरी, अतिवृष्टीने कोकणवासियांपुढे भविष्यात अन्नसुरक्षेचा प्रश्न गंभीर होण्याची चिन्हे आहेत. कारण अन्नधान्याचा स्त्रोत असणाऱ्या महत्वाचे साधनांचे म्हणजे शेतजमीन,

## 'प्रयास' संस्थेची पाहणी

नदी, जंगल, डोंगर उतार अशा नैसर्गिक संसाधनाचे गंभीर नुकसान झाले आहे.

यातील बहुतेक नुकसान लगेच भरून येणे अवघड असल्याने त्यांच्याशी निगडीत असणारी शेती, मच्छिमारी, फाटी विकणे अशासारखी उपजिविकेची कामे आणि शेतमजुरी दीर्घकाळासाठी धोक्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक जनतेला अनिश्चित काळासाठी अन्नधान्याचा तुटवडा भेडसावणार आहे. गुरे आणि

- **मुंबईच्या धर्तीवर स्वतंत्र समिती हवी**
- **पशुधनाचे नुकसान सरकारच्या गावी नाहीच**
- **अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका आदिवासी, दलित आणि परित्यक्तांना.**
- **दीर्घकालीन उपायांबाबत सरकार उदासीन**

अन्नसाठे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या सामाजिक



आर्थिक अरिष्टाची सर्वाधिक झळ आदिवासी, विधवा, परित्यक्ता स्त्रिया, भूमिहीन दलित अशा वंचित गटांना बसली आहे. तातडीने उपाययोजना न झाल्यास हे गट कायमचे देशोधडीला लागतील, अशी भीती 'प्रयास'ने व्यक्त केली आहे.

मुंबईच्या पुरासाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धर्तीवर कोकणातील अतिवृष्टीचा सर्वांगीण सखोल अभ्यास करून, उपाययोजना सुचविण्यासाठी व्यापक कार्यकक्षा असलेली स्वतंत्र समिती नेमावी. त्यात लोकांचा सहभाग म्हणून विविध प्रतिनिधी असावेत. पूर नियंत्रणासाठी केवळ अभियांत्रिकी उपायांचा विचार न करता स्थानिक लोकांच्या अनुभवातील नैसर्गिक व जैविक उपायांची जोड आवश्यक असल्याचे 'प्रयास'ने पाहणी अहवालात म्हटले आहे.

# पूरपरिस्थितीसाठी स्वतंत्र समिती नेमावी

## प्रयास संस्थेची मागणी

रत्नागिरी, ता. २२ : गेल्या जुलैमध्ये कोकणात झालेल्या अतिवृष्टीमागे मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांचा साकल्याने अभ्यास करून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. यासाठी शासनाने मुंबईसाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धरतीवर कोकणासाठी व्यापक कार्यकक्ष असणारी, बहुशाखीय व लोकसहभागी पद्धतीने अभ्यास करणारी स्वतंत्र समिती नेमण्याची मागणी पुण्यातील प्रयास या स्वयंसेवी संस्थेने तयार केलेल्या अहवालात केली आहे.

या अहवालाचे प्रकाशन आज येथे झाले. हा अहवाल रायगड आणि पेण, रोहा, माणगाव, महाड, खेड, चिपळूण, गुहागर आणि संगमेश्वर तालुक्यातील ४७ वाड्यांमध्ये केलेल्या क्षेत्र पाहणीवर आधारलेला आहे.

या समितीने कोकणातील विकासकामे, त्यासाठी पूरक उद्योग यांच्यासाठी नाजूक स्थितीत असणाऱ्या स्थानिक नैसर्गिक परिसंस्थेला धोका पोहोचणार नाही, असे ठोस व नेमके निकष तयार करून त्यांच्या अमंलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा उभारावी. पूर नियंत्रणासाठी केवळ अभियांत्रिकी उपायांचा विचार करणे योग्य नाही. त्याऐवजी परिसंस्थेच्या एकात्मिक दृष्टीकोनातून पुढे येणाऱ्या नैसर्गिक किंवा जैविक उपायांना तेथेच अभियांत्रिकी उपायांची जोड देणे आवश्यक आहे. आपत्ती प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या खात्यांमध्ये जैविक उपायांच्या विकासासाठी जैव अभियांत्रिकी विभाग सुरू करण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली आहे.

शासनाने पुरवलेल्या तातडीच्या मदतीसंदर्भात तातडीची मदत पोहोचवताना भ्रष्टाचार कसा व कोठे झाला? याची ताबडतोब चौकशी व्हावी आणि त्यानुसार संबंधितांवर त्वरित कारवाई व्हावी. अद्यापही तातडीची मदत पोहोचलेली नाही, अशी ठिकाणे शोधण्याची आणि त्या त्या ठिकाणी मदत पोहोचवण्याची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी. सर्वेक्षणाबाबत स्थानिकांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी तहसीलदार कार्यालयात एक विशेष कक्ष चालू करावा आणि त्यानुसार पुर्नसर्वेक्षणासाठी आदेश जारी केले जावेत. तातडीची मदत सर्व आपद्ग्रस्तांपर्यंत परिणामकारकपणे पोहोचावी यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता समित्या नेमण्यासारख्या उपायांचा गांभीर्याने विचार व्हावा. यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया आतापासून सुरू व्हाव्यात. त्याप्रमाणे तातडीच्या मदतीबाबतच्या धोरणाचा पुनर्विचार होण्यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, तज्ज्ञ आणि अभ्यासकांशी विचारविनिमयाची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी, असे अहवालात म्हटले आहे.

शेतीवर उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्णपणे नष्ट झालेल्या जमिनीएवढी जमिन उपलब्ध करून द्यावी. नुकसान झालेल्या शेतजमिनींचे सर्वेक्षण महसूल विभागाने करावे आणि हद्द निशाण्या कायम कराव्यात. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाच्या तुलनेत मिळणारी भरपाई तुटपुंजी आहे. त्यामुळे शेतीमधील गुंतवणूक श्रम, यांचा विचार करून नुकसानीसाठी मदत जाहीर करावी.

असुरक्षित ठिकाणी असलेल्या घरांबाबत विविध क्षेत्रातील तज्ञांची एकत्रित मदत घेऊन वस्ती नियोजनाच्या दृष्टीने नियम आणि निकष तयार करावेत. अतिवृष्टीग्रस्त भागांच्या दुरुस्तीचा प्रश्न गांभीर्याने लक्षात घेऊन इंदिरा आवास योजना आणि आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या घरदुरुस्ती योजनेच्या धरतीवर घरांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक पाठबळ द्यावे. जनावरांच्या विविध प्रकारच्या नुकसानाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करून त्यासाठी वेगळी नुकसान भरपाई द्यायला हवी. पीकनुकसानीमुळे उद्भवणाऱ्या चाराटंचाईसाठी शासनाने आधीपासूनच तयारी करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठ्याबाबतही काही मुद्दे या अहवालात मांडण्यात आले आहेत. कोकणातील सर्व पूरग्रस्त क्षेत्रामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अंत्योदयच्या दराने धान्य, कडधान्य, तेल उपलब्ध करून द्यावे. मजुरीच्या प्रश्नाची तीव्रता कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे आवश्यक आहे. आरोग्याच्या समस्येवर उपाय म्हणून आदिवासी व दलित समाजाच्या वाड्यांसाठी आरोग्य खात्याने विशेष मोहिम हाती घेऊन साथीचे आजार आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करायला हवेत.

कोकणातील शेतजमिनींचे नुकसान पाहता शासनाने रोजगार हमी योजनेतून शेतजमिन दुरुस्तीबाबतचा निर्णय जाहीर केला आहे. यात ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांच्या जमिनी दुरुस्त करण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी जमिनींच्या नुकसानाचे पंचनामे तयार करावेत. हे प्रस्ताव फळबाग योजनेच्या धरतीवर मंजूर होतील आणि त्यानंतर जमिनीवर दुरुस्तीचे काम सुरू होईल. हे सर्व काम येत्या ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून काम पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेला त्याची सूचना देणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात अशा कामांना प्रारंभ झालेला नसल्याचे अहवालात म्हटले आहे.

# कोकणातील अरिष्टांवर अभावानेच चर्चा

अलिबाग, ता. २३ (बातमीदार) : जुलै व ऑगस्ट महिन्यांत झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे आलेल्या पुराचा सर्वाधिक फटका मुंबई व संपूर्ण कोकणाला बसला. मुंबईवरील नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीवर दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत अनेक वेळा चर्चा झाली, परंतु कोकणातील अरिष्टांबाबत अभावानेच चर्चा झालेली दिसते, अशी माहिती पुण्याच्या 'प्रयास' संस्थेचे सदस्य राम कवळगे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

अरिष्टांमागील मूळ कारणे, त्याचे परिणाम व स्थानिकांच्या दृष्टीतून शासनाचा प्रतिसाद, तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजना व अपेक्षा यांची सर्वंकष मांडणी करणारा 'कोकणातील अरिष्टांवर उपाय स्थानिकांच्या नजरेतून' याबाबतचा अहवाल प्रयास संस्थेने तयार केला आहे. त्यामध्ये अरिष्टाचे शासनाकडून दुर्लक्षित राहिलेले अनेक पैलू समोर आणले आहेत. त्यामध्ये एका बाजूने विकास प्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद अतिक्रमण व दुसऱ्या बाजूने अतिवृष्टीच्या आघातामुळे मुळातच नाजूक जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची (डोंगर, नद्या-खाड्या, खाजणे इत्यादी) कधीही भरून न येण्याजोगी हानी झाली आहे. या नैसर्गिक व्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे व संसाधनांचे विविधप्रकारे नुकसान होऊन या नैसर्गिक अरिष्टाचे रूपांतर आर्थिक व सामाजिक अरिष्टामध्ये झाले. आदिवासी, दलित, स्त्रिया अशा आर्थिक-राजकीय पातळीवरील परिघावर असणाऱ्या समाजघटकांना सर्वच स्तरांवरून सोसावा लागलेला अन्याय व उपेक्षेमुळे त्यांच्यासाठी अरिष्टाची तीव्रता अधिकच वाढली आहे. अरिष्टामुळे अन्न सुरक्षेचा प्रश्न वंचितांसह सर्व प्रभावित कुटुंबांसाठी गंभीर होणार आहे. परिणामी तीव्र कुपोषण, अनारोग्याबरोबरच विशेषतः वंचित समाजगटांमध्ये कर्जबाजारीपणा व स्थलांतर यात वाढ झालेली दिसते. आपत्ती व्यवस्थापनाचे स्वतंत्र 'खाते' चालविणाऱ्या शासनाने तातडीच्या मदतीचे वाटप तर सोडाच; परंतु नुकसानीचे मोजमापही धड केले नाही, असेही श्री. कवळगे म्हणाले.

## स्थानिकांच्या नजरेतून उपाय सुचविण्यासाठी 'प्रयास'चा अहवाल

रायगड जिल्ह्यातील एकूण ३४ हजार ४५६ हेक्टर शेतीचे क्षेत्र हे बाधित झालेले आहे. हे बाधित क्षेत्र पिकते करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून कामे करण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आलेली मदत तुटपुंजी आहे, असे ते म्हणाले.

मुंबईचा अभ्यास करण्यासाठी शासनाने चितळे समिती नेमलेली असली, तरी ग्रामीण भागात मात्र अशी समिती अद्याप नेमलेली नसून, तशी समिती नेमली जावी अशी मागणीही त्यांनी या वेळी केली.

ॲड. सुरेखा दळवी यांनी माहिती देताना नुकसानग्रस्त आदिवासींची सात:बारावर नोंद नसल्याने जिल्ह्यात ९८ टक्के आदिवासींना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे सांगितले. अलिबाग व पेण तालुक्यांतील आदिवासींच्या ३६३ हेक्टरपैकी २२९ हेक्टर जमीन अतिवृष्टीत नापीक झाल्याने त्याचा पंचनामा शासनामार्फत झाला नाही म्हणून आम्ही ही माहिती संकलित करून शासनाकडे पाठविली; परंतु कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मदत वाटपाच्या वेळी मदतच मिळाली नसल्याचे श्रीमती दळवी म्हणाल्या. अंकुरच्या वैशाली पाटील यांनीही शासनाकडून आदिवासींवर कशा प्रकारे अन्याय केला जातो याबाबतची माहिती या वेळी दिली.

# पूरपरिस्थितीसाठी स्वतंत्र समिती नेमावी

## प्रयास संस्थेची मागणी

रत्नागिरी, ता. २२ : गेल्या जुलैमध्ये कोकणात झालेल्या अतिवृष्टीमागे मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांचा साकल्याने अभ्यास करून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. यासाठी शासनाने मुंबईसाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धरतीवर कोकणासाठी व्यापक कार्यकक्ष असणारी, बहुशाखीय व लोकसहभागी पद्धतीने अभ्यास करणारी स्वतंत्र समिती नेमण्याची मागणी पुण्यातील प्रयास या स्वयंसेवी संस्थेने तयार केलेल्या अहवालात केली आहे.

या अहवालाचे प्रकाशन आज येथे झाले. हा अहवाल रायगड आणि पेण, रोहा, माणगाव, महाड, खेड, चिपळूण, गुहागर आणि संगमेश्वर तालुक्यातील ४७ वाड्यांमध्ये केलेल्या क्षेत्र पाहणीवर आधारलेला आहे.

या समितीने कोकणातील विकासकामे, त्यासाठी पूरक उद्योग यांच्यासाठी नाजूक स्थितीत असणाऱ्या स्थानिक नैसर्गिक परिसंस्थेला धोका पोहोचणार नाही, असे ठोस व नेमके निकष तयार करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा उभारावी. पूर नियंत्रणासाठी केवळ अभियांत्रिकी उपायांचा विचार करणे योग्य नाही. त्याऐवजी परिसंस्थेच्या एकात्मिक दृष्टीकोनातून पुढे येणाऱ्या नैसर्गिक किंवा जैविक उपायांना तेथेच अभियांत्रिकी उपायांची जोड देणे आवश्यक आहे. आपत्ती प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या खात्यांमध्ये जैविक उपायांच्या विकासासाठी जैव अभियांत्रिकी विभाग सुरू करण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली आहे.

शासनाने पुरवलेल्या तातडीच्या मदतीसंदर्भात तातडीची मदत पोहोचवताना भ्रष्टाचार कसा व कोठे झाला? याँची तांबडतोब चौकशी व्हावी आणि त्यानुसार संबंधितांवर त्वरित कारवाई व्हावी. अद्यापही तातडीची मदत पोहोचलेली नाही, अशी ठिकाणे शोधण्याची आणि त्या त्या ठिकाणी मदत पोहोचवण्याची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी. सर्वेक्षणाबाबत स्थानिकांच्या तक्रारी नोंदवण्यासाठी तहसीलदार कार्यालयात एक विशेष कक्ष चालू करावा आणि त्यानुसार पुर्नसर्वेक्षणासाठी आदेश जारी केले जावेत. तातडीची मदत सर्व आपद्ग्रस्तांपर्यंत परिणामकारकपणे पोहोचावी यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता समित्या नेमण्यासारख्या उपायांचा गांभीर्याने विचार व्हावा. यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया आतापासून सुरू व्हाव्यात. त्याप्रमाणे तातडीच्या मदतीबाबतच्या धोरणाचा पुनर्विचार होण्यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, तज्ञ आणि अभ्यासकांशी विचारविनिमयाची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी, असे अहवालात म्हटले आहे.

शेतीवर उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्णपणे नष्ट झालेल्या जमिनीएवढी जमिन उपलब्ध करून द्यावी. नुकसान झालेल्या शेतजमिनींचे सर्वेक्षण महसूल विभागाने करावे आणि हद्द निशाण्या कायम कराव्यात. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाच्या तुलनेत मिळणारी भरपाई तुटपुंजी आहे. त्यामुळे शेतीमधील गुंतवणूक श्रम, यांचा विचार करून नुकसानीसाठी मदत जाहीर करावी.

असुरक्षित ठिकाणी असलेल्या घरांबाबत विविध क्षेत्रातील तज्ञांची एकत्रित मदत घेऊन वस्ती नियोजनाच्या दृष्टीने नियम आणि निकष तयार करावेत. अतिवृष्टीग्रस्त भागांच्या दुरुस्तीचा प्रश्न गांभीर्याने लक्षात घेऊन इंदिरा आवास योजना आणि आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या घरदुरुस्ती योजनेच्या धरतीवर घरांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक पाठबळ द्यावे. जनावरांच्या विविध प्रकारच्या नुकसानाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करून त्यासाठी वेगळी नुकसान भरपाई द्यायला हवी. पीकनुकसानीमुळे उद्भवणाऱ्या चाराटंचाईसाठी शासनाने आधीपासूनच तयारी करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठ्याबाबतही काही मुद्दे या अहवालात मांडण्यात आले आहेत. कोकणातील सर्व पूरग्रस्त क्षेत्रामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अंत्योदयच्या दराने धान्य, कडधान्य, तेल उपलब्ध करून द्यावे. मजुरीच्या प्रश्नाची तीव्रता कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे आवश्यक आहे. आरोग्याच्या समस्येवर उपाय म्हणून आदिवासी व दलित समाजाच्या वाड्यांसाठी आरोग्य खात्याने विशेष मोहिम हाती घेऊन साथीचे आजार आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करायला हवेत.

कोकणातील शेतजमिनींचे नुकसान पाहता शासनाने रोजगार हमी योजनेतून शेतजमिन दुरुस्तीबाबतचा निर्णय जाहीर केला आहे. यात ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांच्या जमिनी दुरुस्त करण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी जमिनींच्या नुकसानाचे पंचनामे तयार करावेत. हे प्रस्ताव फळबाग योजनेच्या धरतीवर मंजूर होतील आणि त्यानंतर जमिनीवर दुरुस्तीचे काम सुरू होईल. हे सर्व काम येत्या ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून काम पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेला त्याची सूचना देणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात अशा कामांना प्रारंभ झालेला नसल्याचे अहवालात म्हटले आहे.

# अभियांत्रिकीबरोबर जैविक उपायांवर भर द्यावा

## आपत्ती व्यवस्थापन विधेयक व्हावे

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. २७ : कोकणात जुलैमध्ये झालेल्या अतिवृष्टीवर केवळ अभियांत्रिकी उपाय न करता जैविक उपायांवर भर देण्याची गरज आहे. याशिवाय अतिवृष्टीग्रस्त लोकांपर्यंत पोहोचण्यात शासन कमी पडले. यात शासनावर टीका करण्याचा उद्देश नाही; मात्र सर्वसामान्य लोकांच्या समस्या जाणून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना योजण्याची गरज आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात यावर ठोस विधेयक होण्यासाठीच पुण्यातील 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेने ७५ पानांचा अहवाल येथे प्रसिद्ध केला.

प्रयास या स्वयंसेवी संस्थेच्या संसाधने व उपजीविका गटाने 'कोकणातील अरिष्टावर उपाय- स्थानिकांच्या नजरेतून' हा अहवाल तयार केला आहे. येथील गीताभवन येथे त्याचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी संस्थेचे राम कवलगी, सचिन वारगडे, प्रांजळ दीक्षित, संदीप लिंगायत आणि अमित असनीकर उपस्थित होते.

या त्यात कोकणातील अरिष्ट आणि शासनाचा प्रतिसाद, अरिष्टाचा शेतीव्यवस्थेवरील परिणाम, अरिष्टाचा दुर्लक्षित पैलू, अरिष्टाचा आदिवासी समाजावर झालेला परिणाम, स्त्रियांच्या नजरेतून अरिष्ट आणि त्यावरील उपाययोजना, अरिष्टाचे मूळ : कारणे आणि उपाय अशा विभागांत मांडणी करण्यात आली आहे.

या अहवालात विविध मुद्द्यांना स्पर्श करण्यात आला आहे. एका बाजूने विकासप्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद मानवी आक्रमण व दुसऱ्या बाजूने अतिवृष्टीचा आघात यामुळे मुळातच नाजूक जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची कधीही भरून न येण्याजोगी हानी झाली आहे. या नैसर्गिक व्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे व संसाधनांचे विविध प्रकारे

### प्रयास संस्थेचा अहवाल

नुकसान होऊन या नैसर्गिक अरिष्टाचे रूपांतर आर्थिक व सामाजिक अरिष्टामध्ये झाले आहे. आदिवासी, दलित, स्त्रिया व आर्थिक, राजकीय पातळीवर परिघावर असणाऱ्या समाजघटकांना सर्व स्तरावरून सोसाव्या लागलेल्या अन्याय व उपेक्षेमुळे त्यांच्यासाठी अरिष्टाची तीव्रता अधिक वाढली, असे अहवालात म्हटले आहे.

या अरिष्टामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न वंचितांसह सर्व प्रभावित कुटुंबांसाठी गंभीर होणार आहे. परिणामी तीव्र कुपोषण, अनारोग्य याबरोबरच विशेषतः वंचित समाजगटांमध्ये कर्जबाजारीपणा व स्थलांतर यात वाढ झालेली दिसते. यातून होणारे शोषण व असुरक्षितता असे दीर्घकालीन परिणाम या प्रक्रियेत सर्वाधिक दुर्लक्षित राहिले. शासनाने अरिष्टाला दिलेला प्रतिसाद मात्र अत्यंत अपुरा आणि तात्पुरत्या विचारावरच आधारित होता. आपत्ती व्यवस्थापनाचे स्वतंत्र खाते चालवणाऱ्या शासनाने तातडीच्या मदतीचे वाटप तर सोडाच परंतु नुकसानाचे मोजमापही धड केले नाही. आपत्तीनिवारण आणि व्यवस्थापन यासाठी राज्य शासनाकडे लिखित धोरणही नाही.

कोकणासारख्या वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशाचा विकास करताना निव्वळ अभियांत्रिकी उपायांचा अवलंब न करता तेथील नैसर्गिक व्यवस्थेला धोका पोहोचणार नाही, असे ठोस व नेमके निकष विकसित करण्याची आवश्यकता आहे. या अरिष्टाचे वंचितांवर झालेले परिणाम लक्षात घेऊन त्यांच्या संरक्षणासाठी कायदेशीर तरतुदी करणे आवश्यक असल्याचे मत या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

एकीकडे राष्ट्रीय पातळीवर आपत्ती व्यवस्थापन विधेयकासारखी प्रागतिक घडामोड प्रस्तावित असताना अरिष्टाचा जबर तडाखा बसलेल्या भागाकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष होत आहे, ही अतिशय खेदाची बाब आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नावर प्रसारमाध्यमांनी पाठपुरावा करावा, असे आवाहन यावेळी प्रयास संस्थेतर्फे यावेळी करण्यात आले.

# प्रकल्प, अतिवृष्टीने कोकणातील निसर्गव्यवस्थेची हानी!

## प्रयास संस्थेचा अहवाल

मुंबई, ता. २६ : एका बाजूने विकास प्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद मानवी आक्रमण व दुसऱ्या बाजूने अतिवृष्टीचा आघात यांमुळे मुळातच नाजूक जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची कधीही भरून न येण्याजोगी हानी झाल्याचे 'प्रयास' संस्थेने सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

संसाधने, ऊर्जा, उपजीविका गट म्हणून पुण्यात कार्यरत असलेल्या 'प्रयास' या स्वयंसेवी गटाने कोकणातील अतिवृष्टीनंतर निर्माण झालेल्या प्रश्न-समस्यांची सखोल पाहणी केली आहे. यासंबंधीचा अहवाल आज येथे पत्रकार परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला. कोकणातील अरिष्ट आणि त्यावरील उपाययोजना यासंदर्भात 'प्रयास'चे राम कवलगी, सचिन वारघडे, प्रांजळ दीक्षित यांनी या अहवालाची सविस्तर माहिती दिली.

कोकणातील निसर्गव्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे, शेती, पशुपालन, मजुरी व छोटे व्यवसाय यांचे मोठे नुकसान होऊन नैसर्गिक आपत्तीचे रूपांतर आर्थिक व सामाजिक अरिष्टामध्ये झाल्याचे 'प्रयास'ने अहवालात म्हटले आहे.

अन्नसुरक्षेचा प्रश्न केवळ वंचित कुटुंबांसाठीच नव्हे, तर बहुसंख्य कोकणवासीयांसाठी गंभीर होणार असल्याची भीती यात व्यक्त करण्यात आली आहे. चाराटंचाईचा प्रश्न निकटच्या काळात उग्र स्वरूप धारण करील, असा इशाराही परिस्थितीवर आधारित पाहणीतून देण्यात आला आहे. दरडी कोसळून, डोंगरांना भेगा पडल्याने, तसेच नदीकाठ खचल्याने अनेक घरे नष्ट झाली. त्याचबरोबर सुरक्षित निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याकडे या अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. अरिष्टातून निर्माण झालेल्या पार्श्वभूमीवर शासनाची अरिष्टाला तोंड देण्याची पूर्वतयारी अपुरी होती हे आढळून आल्याचे आणि आदिवासी, दलित, परित्यक्ता, भूमिहीन अशा वंचित गटांच्या विशेष समस्यांचा विचार झालेला नाही, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

कोकणातील सर्व पूरग्रस्त क्षेत्रांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करून धान्य, कडधान्ये, तेल उपलब्ध करून देण्यात यावे, अरिष्टामुळे ओढवलेले स्थलांतर रोखण्यासाठी नेहमीच्या निकषांऐवजी परिस्थितीजन्य निकषांवर पंचक्रोशीनिहाय रोजगार हमी योजना कामे काढली जावीत. शेतीची, बांधबंदिस्तीची कामे, शेतीची पाहणी, हद्दनिश्चिती कायम करणे ही कामे केली जावीत, अशा मागण्या 'प्रयास'ने केल्या आहेत. 'आपत्ती निवारण' व्यवस्थापन वा उपाययोजनांचा विचार करताना स्त्रियांना गृहीत धरले जात नसल्याचे नमूद करून 'प्रयास'ने यासंदर्भात शासनाने एक समिती नेमावी, अशी मागणी केली आहे.

# 'प्रयास' तर्फे आज रत्नागिरीत कोकणातील अरिष्टावर चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. १९ : पुण्यातील 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेतर्फे उद्या (ता. २०) गेल्या जुलैमध्ये कोकणात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या अरिष्टाविषयीचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेने अतिवृष्टीमुळे कोकणात झालेल्या नुकसानीविषयीचा अहवाल तयार केला आहे. प्रत्यक्ष नुकसान आणि भरपाईबाबतची शासकीय कार्यवाही याबाबतचा आढावा त्यात घेण्यात आला आहे. या अहवालाच्या निमित्ताने चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. येथील गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष देव यांच्या अध्यक्षतेखालील हे चर्चासत्र त्याच महाविद्यालयात उद्या दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत होईल.

यावेळी डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई आणि प्रा. सुनील जोशी (गोगटे कॉलेज, रत्नागिरी), अशोक कदम (परिवर्तन, चिपळूण), विलास होडे (ज्येष्ठ पत्रकार), चिपळूण येथील डी. बी. जे. महाविद्यालयाच्या प्रा. श्रीमती शकुंतला लड्डा तसेच अन्य काही वक्त्यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

# कोकणातील नुकसानीची कारणे शोधण्यास समिती नेमा

## 'प्रयास' संस्थेची मागणी

पुणे, ता. २१ : कोकणात अतिवृष्टीनंतर झालेल्या नुकसानीची नैसर्गिक व मानवनिर्मित कारणे शोधून काढण्यासाठी समिती नेमावी, विकासकामांमुळे नैसर्गिक परिसंस्थेला धोका निर्माण होणार नाही, असे धोरण ठरवावे, अशा मागण्या 'प्रयास' संस्थेने केल्या आहेत.

कोकणात झालेल्या नुकसानीबद्दल संस्थेने केलेला पाहणी अहवाल संस्थेचे विश्वस्त सुबोध वागळे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत सादर केला, त्यामध्ये या मागण्या मांडण्यात आल्या.

विकास करताना अभियांत्रिकीबरोबरच नैसर्गिक व जैविक बाबींचाही विचार करावा असे सांगून श्री. वागळे म्हणाले, ''कोकणात अतिवृष्टीमुळे अन्नसुरक्षा, उपजीविकेची कामे यांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. पिके, घरे, गुरे, गोठे यांचेही मोठे नुकसान झाले आहे. वंचित गटांकडे कागदपत्रे नसणे, अधिकाऱ्यांपर्यंत पोचू न शकणे आदी कारणांमुळे त्यांचे पुनर्वसन अवघड होत आहे. नुकसानीची नोंद करताना सरकारी अधिकाऱ्यांनी कमी नुकसान नोंदविल्याचे नागरिक सांगत आहे. अरिष्टाला तोंड देण्याची शासनाची पूर्वतयारी अपुरी आहे हे सिद्ध झाले. तातडीची मदत पोचवताना भ्रष्टाचार झाला असून, त्याची चौकशी करावी.''

नुकसानीवर उपाय सुचविताना ते म्हणाले, ''सरकारने नुकसान झालेल्या शेतजमिनीची पाहणी करून हद्द, निशाण्या कायम कराव्यात. शेतजमिनीच्या दुरुस्तीची कामे लोकसहभागातून करावीत. घरांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक पाठबळ द्यावे, आदिवासी भूमिहीन, दलित, स्त्रिया यांना अंत्योदय दराने धान्य द्यावे, रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावीत, आरोग्य समस्यांवर उपाय करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, आपत्ती व्यवस्थापन व निवारणासाठी गाव समित्या निर्माण कराव्यात.''

# विकास प्रकल्प आणि अतिवृष्टीमुळे कोकणातील निसर्गव्यवस्थेची हानी

२६ [illegible] २००५ मु. ([illegible])

## प्रयास संस्थेचा अहवाल

मुंबई, ता. २५ : एका बाजूने विकास प्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद मानवी आक्रमण व दुसऱ्या बाजूने अतिवृष्टीचा आघात यामुळे मुळातच नाजूक जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची कधीही भरून न येण्याजोगी हानी झाल्याचे 'प्रयास' संस्थेने सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

संसाधने, ऊर्जा, उपजीविका गट म्हणून पुण्यात कार्यरत असलेल्या 'प्रयास' या स्वयंसेवी गटाने कोकणातील अतिवृष्टीनंतर निर्माण झालेल्या प्रश्न-समस्यांची सखोल पाहणी केली आहे. यासंबंधीचा अहवाल आज येथे पत्रकार परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला. कोकणातील अरिष्ट आणि त्यावरील उपाययोजना या संदर्भात 'प्रयास'चे राम कवलगी, सचिन वारघडे, प्रांजळ दीक्षित यांनी या अहवालाची सविस्तर माहिती दिली.

कोकणातील निसर्गव्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे, शेती, पशुपालन, मजुरी व छोटे व्यवसाय यांचे मोठे नुकसान होऊन नैसर्गिक आपत्तीचे रूपांतर आर्थिक व सामाजिक अरिष्टामध्ये झाल्याचे 'प्रयास'ने अहवालात म्हटले आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न केवळ वंचित-कुटुंबासाठीच नव्हे तर बहुसंख्य कोकणवासीयांसाठी गंभीर होणार असल्याची भीती यात व्यक्त करण्यात आली आहे. चाराटंचाईचा प्रश्न निकटच्या काळात उग्र स्वरूप धारण करील, असा इशाराही परिस्थितीवर आधारित पाहणीतून देण्यात आला आहे. दरडी कोसळून, डोंगरांना भेगा पडल्याने तसेच नदीकाठ खचल्याने अनेक घरे नष्ट झाली. त्याबरोबरच सुरक्षित निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याकडे या अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे. अरिष्टातून निर्माण झालेल्या पार्श्वभूमीवर शासनाची अरिष्टाला तोंड देण्याची पूर्वतयारी अपुरी होती हे आढळून आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. कोकणातील सर्व पूरग्रस्त क्षेत्रांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करून धान्य उपलब्ध करून देण्यात यावे, अरिष्टामुळे होऊ घातलेले स्थलांतर रोखण्यासाठी नेहमीच्या निकषांऐवजी परिस्थितीजन्य निकषांवर पंचक्रोशीनिहाय रोहयो कामे काढली जावीत. बांधबंदिस्तीची कामे, शेतीचे सर्वेक्षण, हद्दीनिशाण्या कायम करणे ही कामे केली जावीत अशा मागण्या 'प्रयास'ने केल्या आहेत. 'आपत्ती निवारण' व्यवस्थापन वा उपाययोजनांचा विचार करताना स्त्रियांना गृहीत धरले जात नसल्याचे नमूद करून 'प्रयास'ने या संदर्भात शासनाने एक समिती नेमावी, अशी मागणी केली आहे.

पेपर सागर २४/०१/०५

# रेल्वे आणि उत्खननामुळे कोकणातील शेती आणि मच्छिमारी धोक्यात

**प्रयास संस्थेच्या अहवालातील निष्कर्ष**

अलिबाग (प्रतिनिधी) :- कोकण रेल्वे, खाणकाम आदींसारख्या आधुनिक विकासाच्या नावाने केले जाणारे बाह्य हस्तक्षेप आणि कोकणातील नैसर्गिक परिस्थितीच्या मर्यादा धुडकावून केले जाणारे प्रयत्न यामुळे शेती, मच्छिमारी जंगलधारित व्यवसाय यासारख्या पारंपारिक उपजिविका पध्दतीवर मोठे गंडांतर येत असून कोकण वासियांच्या उपजिविकेची सुरक्षितताच यामुळे अनिश्चित काळासाठी धोक्यात आली असल्याचे पुण्यातील प्रयास संस्थेने प्रसिध्द केलेल्या एका अहवालात नमुद करण्यात आले आहे.

जुलै व ऑगस्ट महिन्यातील पूर व अतिवृष्टीने झालेले नुकसान आणि त्यांचे विविधांगी परिणाम लोकांच्या दृष्टीकोनातून समजावून घेणे, शासनाच्या तत्कालीन आणि दीर्घकालीन उपाय योजनांबाबत लोकांचे अनुभव आणि अपेक्षा जाणून घेणे या उद्देशाने प्रयास या स्वयंसेवी संस्थेने अभ्यास करून हा अहवाल प्रसिध्द केला हा अहवाल तयार करताना रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील ४७ वाड्यांमध्ये फिरून तेथील जनतेशी संपर्क साधून परिस्थिती पाहून तयार केला आहे. रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पेण, रोहा, माणगांव , खेड, चिपळूण , गुहागर आणि संगमेश्वर असा ८ तालुक्यांचा समावेश आहे.

......▶ वृत्त ३ वर

करताना.

सागर, २४/१२/०५

# वंचितांच्या प्रश्नांची आम्ही दखल घेतो - राम कवलगी

चिपळूण :- कोकणातील विविध संस्था संघटनांसोबत सातत्याने संपर्क व काम असल्याने कोकणवासियांसाठी या अरिष्टाची असणारी तीव्रताहि 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेला प्रकर्षाने जाणवली. कोकणातील प्रत्यक्ष भेटींमधून दिसून आले की, ज्यांना अरिष्टाची सर्वाधिक झळ पोचली अशा स्थानिक लोकांच्या गरजा आणि म्हणणे कोणीहि ऐकून न घेतल्याने स्थानिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे जगण्याचे प्रश्नहि शासनाकडून दुर्लक्षित राहण्याचा संभव असल्याने आम्ही आमच्या 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून वंचितांच्या प्रश्नांची दखल घेण्याचे कार्य करीत असल्याचे प्रतिपादन या स्वयंसेवी संस्थेचे वरिष्ठ सहयोगी संशोधक श्री. राम कवलगी यांनी चिपळूण येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, आमच्या 'प्रयास' या संस्थेमार्फत सध्या या दुर्लक्षित प्रश्नांच्या तात्काळ गोष्टींसाठी प्रयत्न चालू आहेत. दीर्घकालीन गोष्टींसाठी दापोली कृषि विद्यापिठाच्या कार्यकर्त्यांना आम्ही दंगल, आपत्ती निवारणसमयी काय करावे याविषयी प्रशिक्षण देत आहोत. आमच्या या 'प्रयास' संस्थेचा नावलौकिक व्हावा अशी आपली इच्छा नसून वंचितांच्या दुर्लक्षित प्रश्नांना न्याय मिळावा असे आपले प्रामाणिक मत असून या प्रश्नांना लोकप्रतिनिधी व राज्य सरकार यांच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे काम पत्रकारांनी करावे असेहि त्यांनी मत व्यक्त केले.

या पार्श्वभूमीवर, अरिष्टामागील मूळ कारणे, त्याचे विविधांगी परिणाम तसेच स्थानिकांच्या दृष्टीतून शासनाचा प्रतिसाद, तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपायांबाबतच्या गरजा व अपेक्षा यांची सर्वंकष मांडणी करणारा एक अहवाल 'प्रयास'ने तयार केला आहे. यातून अरिष्टाचे शासनाकडून दुर्लक्षित राहिलेले अनेक पैलू समोर येतात ते असे की, कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची कधीहि भरुन न येण्याजोगी हानी झाली. नैसर्गिक अरिष्टाचे रुपांतर आर्थिक व सामाजिक अरिष्टामध्ये झाले. आदिवासी, दलित, स्त्रिया अशा आर्थिक-राजकीय पातळीवर असणाऱ्या समाजघटकांना सर्व स्तरावरुन सोसावा लागलेला अन्याय व उपेक्षेमुळे त्यांच्यासाठी अरिष्टाची तीव्रता अधिकच वाढली. शोषण व असुरक्षितता असे दीर्घकालीन परिणाम या प्रक्रियेत सर्वाधिक दुर्लक्षित राहिले. शासनाने अरिष्टाला दिलेला प्रतिसाद मात्र अत्यंत अपुरा आणि तात्पुरत्या विचारावरच आधारित असल्याने आपत्ती व्यवस्थापनाचे स्वतंत्र 'खाते' चालवणाऱ्या शासनाने तातडीच्या मदतीचे वाटप तर सोडाच परंतु नुकसानाचे मोजमापहि धड केले नाही. आपत्ती निवारण आणि व्यवस्थापन याकरिता तर राज्यशासनाकडे लिखित धोरणहि नाही.

या मुद्द्यांचा विचार करता अरिष्ट-निवारणासाठी तसेच प्रतिबंधासाठी अधिक व्यापक आणि मूलगामी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. एकीकडे राष्ट्रीय पातळीवर 'आपत्ती व्यवस्थापन' विधेयकासारखी 'प्रागतिक' घडामोड प्रस्तावित असताना अरिष्टाचा जबर तडाखा बसलेल्या भागाकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष होत आहे. ही अतिशय खेदाची बाब आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नावर प्रसारमाध्यमांनी वातावरण निर्मितीसाठी तातडीचे प्रयत्न करणे अतिशय गरजेचे आहे असे 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

यावेळी व्यासपीठावर 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेचे सहयोगी संशोधक राम कवलगी, प्रांजळ दीक्षित, सचिन वारघडे, संदिप लिंगायत, अमित असनीकर व चिपळूणमधील पत्रकार उपस्थित होते.

सागर, २४/०१/०५

# रेल्वे आणि उत्खननामुळे कोकणातील शेती आणि मच्छिमारी धोक्यात

## प्रयास संस्थेच्या अहवालातील निष्कर्ष

अलिबाग ( प्रतिनिधी ) :– कोकण रेल्वे, खाणकाम आदींसारख्या आधुनिक विकासाच्या नावाने केले जाणारे बाह्य हस्तक्षेप आणि कोकणातील नैसर्गिक परिस्थितीच्या मर्यादा धुडकावून केले जाणारे प्रयत्न यामुळे शेती, मच्छिमारी जंगलधारित व्यवसाय यासारख्या पारंपारिक उपजिविका पध्दतीवर मोठे गंडांतर येत असून कोकण वासियांच्या उपजिविकेची सुरक्षितताच यामुळे अनिश्चित काळासाठी धोक्यात आली असल्याचे पुण्यातील प्रयास संस्थेने प्रसिध्द केलेल्या एका अहवालात नमुद करण्यात आले आहे.

जुलै व ऑगस्ट महिन्यातील पूर व अतिवृष्टीने झालेले नुकसान आणि त्यांचे विविधांगी परिणाम लोकांच्या दृष्टीकोनातून समजावून घेणे, शासनाच्या तत्कालीन आणि दीर्घकालीन उपाय योजनांबाबत लोकांचे अनुभव आणि अपेक्षा जाणून घेणे या उद्देशाने प्रयास या स्वयंसेवी संस्थेने अभ्यास करून हा अहवाल प्रसिध्द केला हा अहवाल तयार करताना रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील ४७ वाड्यांमध्ये फिरून तेथील जनतेशी संपर्क साधून परिस्थिती पाहून तयार केला आहे. रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पेण, रोहा, माणगांव , खेड, चिपळूण , गुहागर आणि संगमेश्वर असा ८ तालुक्यांचा समावेश आहे.

कोकणासारख्या दुर्गम आणि नाजूक नैसर्गिक रचना असलेल्या प्रदेशात कोकणच्या विकासासाठी सुरू झालेल्या कोकण रेल्वेचा स्थानिक लोकांना फारसा फायदा झाला नाही.

फार्म हाऊस, कंत्राटी शेती रिसॉर्टस्, हॉटेल तसेच कारखानदारीच्या नावाखाली शहरी भांडवलदार व श्रीमंत वर्गाकडून कोकणातील जमिनी हस्तगत करण्याचे प्रमाण मोठे आहे. मच्छीमारींमध्ये बडया व्यावसायिकांमुळे स्थानिक छोट्या मच्छिमारांवर संकट येत आहे. यामुळे प्रचंड नैसर्गिक साधन संपत्ती असून देखील कोकणातील बहुसंख्य लोकांपुढे जगण्याचा प्रश्न तीव्र बनला आहे. येथील अर्थव्यवस्थेला धक्का बसल्याचे अहवालात नमुद करण्यात आले आहे. अतिवृष्टी व दरडी कोसळल्यामुळे ज्या शेत जमिनीत मोठ - मोठे दगड धोंडे आणि गाळ यांचा दीड फुटापेक्षा जास्त उंचीचा थर साठला आहे. तेथे नुकसानीचे प्रमाण व तीव्रता फार मोठी आहे. या शेतांमध्ये बाहेरून यंत्र सामुग्री, आर्थिक मदत मिळाली तरी अनेक हंगाम जमिनी पूर्वस्थितीत येणार नाहीत कोकणातील भौगोलिक भिन्नतेमुळे शेती जमिनीमध्ये खूप वैविध्य आढळते. त्यावरील उपाय योजनेतही वैविध्य असणे गरजेचे असून शेत जमिनींची दुरुस्ती लोक सहभागाशिवाय शक्य नाही असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

सागर, २४ ... ०५

# आपत्कालीन तातडीच्या व दीर्घकालीन उपायांचा अहवाल शासनास सादर

रत्नागिरी (वार्ताहर) : कोकणात जुलै महिन्यात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीची झळ स्थानिकांना पोहोचली; परंतु स्थानिकांचे म्हणणे नेहमीप्रमाणे कोणीही ऐकून घेतले नाही. परिणामी, स्थानिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे जगण्याचे प्रश्नही शासनाच्या लेखी दुर्लक्षित राहण्याचा धोका आहे. स्थानिकांच्या दृष्टीतून शासनाचा प्रतिसाद, तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपायांबाबतच्या गरजा व अपेक्षा यांची सर्वंकष मांडणी करणारा एक अहवाल 'प्रयास'ने तयार केला असल्याची माहिती राम कवलगी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले की, एका बाजूने विकास प्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद मानवी आक्रमण व दुसऱ्या बाजूने अतिवृष्टीचा आघात यामुळे मुळातच नाजूक जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची कधीही भरून न येण्याजोगी हानी झाली. या नैसर्गिक व्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे व संसाधनांचे विविध प्रकारे नुकसान होऊन या नैसर्गिक आरीष्टांचे रूपांतर आर्थिक व सामाजिक आरीष्टांमध्ये झाले.

आदिवासी, दलित, स्त्रिया अशा आर्थिक-राजकीय पातळीवर परीघावर असणाऱ्या समाजघटकांना सर्व स्तरावरून सोसावा लागलेला अन्याय व उपेक्षेमुळे त्यांच्यासाठी आरीष्टाची तीव्रता अधिक वाढली. या आरीष्टामुळे अन्न सुरक्षेचा प्रश्न वंचितांसहित सर्व प्रभावित कुटुंबांसाठी गंभीर होणार आहे. शासनाने आरीष्टाला दिलेला प्रतिसाद मात्र अत्यंत अपुरा आणि तात्पुरत्या विचारावरच आधारित होता.

सर्वेक्षणाबाबत स्थानिकांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी तहसीलदार कार्यालयात एक विशेष कक्ष चालू करावा आणि त्यानुसार पुनर्सर्वेक्षणासाठी आदेश जारी करावेत, नुकसान झालेल्या शेतजमिनींचे सर्वेक्षण महसूल विभागाने करावे, शेतजमिनीच्या झालेल्या नुकसानीचा आराखडा लोकसहभागाने तयार करावा, जनावरांच्या विविध प्रकारच्या नुकसानाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करून त्याकरिता वेगळी नुकसानभरपाई द्यायला हवी, मजुरीच्या प्रश्नांची तीव्रता कमी करण्यासाठी रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे आवश्यक आहे, अतिवृष्टीचे रूपांतर पुराच्या आरीष्टात होण्यामागे असणाऱ्या मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांचा साकल्याने अभ्यास करून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

यासाठी शासनाने मुंबईसाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धर्तीवर कोकणासाठी व्यापक कार्यकक्ष असणारी बहुशास्त्रीय व लोकसहभागी पद्धतीने अभ्यास करणारी स्वतंत्र समिति[illegible] उपाययोजनांबाबत शिफारशी शासनाकडे 'प्रयास'ने केल्या आहेत. यावेळी 'प्रयास'चे सचिन वारगडे, प्रांजळ दीक्षित, संदीप लिंगायत, अमित असनीकर आदी उपस्थित होते.

# आक्रमणामुळे कोकणावर अरिष्ट : प्रयास संस्थेचा निष्कर्ष

अलिबाग, दि. २५ -

मुंबईचा विकास व रायगडचा विकास हा एकमेकांना जोडलेला असला तरी रायगडसह कोकणचा विकास करताना निसर्गावर झालेल्या आक्रमणामुळे कोकणावर अरिष्ट कोसळले व कधीही भरून न येणारी हानी झाली असल्याची 'प्रयास' या संस्थेने केलेल्या अहवालाचा निष्कर्ष आहे.

२४ व २५ जुलैच्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण कोकण काही तासांतच बेचिराख झाला. प्रलयकारी महापूर व दरडी कोसळल्याने गावच्या गावे ढिगाऱ्याखाली माणसांसह गाडली गेली. हजारो जनावरे वाहून गेली. केवळ विकासाच्या नावावर केलेल्या निसर्गावरील आक्रमणामुळे हे घडले, जे कोकणात घडले तेच मुंबईतही घडले. मुंबईवर अरिष्ट कोसळले ते केवळ अतिवृष्टीमुळे नव्हे तर मुंबई शहराच्या अविचारी, अनियंत्रित आणि निसर्गाविरोधी विकासामुळे असा निष्कर्ष प्रयासच्या अहवालात काढण्यात आला आहे. प्रयासने हा अहवाल रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील आठ तालुक्यांत ४७ गावांतील प्रत्यक्ष पाहणीवरून तयार केला आहे. पर्यावरणामुळे दुर्लक्ष करून केलेला विकास किती भयावह ठरला हे संपूर्ण देशाने पाहिले. या प्रश्नाचे गांभीर्य पाहता यावर पुरेशी चर्चादेखील नागरी समाजात घडली गेली नाही, ही खेदाची बाब आहे. या अहवालातून पुढे आलेली माहिती आणि विश्लेषण याच्या आधारे अरिष्टाच्या मुळाशी कोणती कारणे आहेत व अशा प्रकारची अरिष्टे पुन्हा उद्‌भवू नयेत यासाठी तातडीने कोणती पावले उचलण्याची गरज आहे हाच यामागचा प्रयासचा उद्देश असल्याचे प्रयासचे राम कवलकी यांनी सांगितले. आदिवासी संघटनेच्या नेत्या ॲड. सुरेखा दळवी, प्रयासचे राम कवलकी, सचिन वारघानी व वैशाली पाटील यांनी हा अहवाल पत्रकार परिषदेत प्रसिद्ध केला.

आपद्‌ग्रस्तांच्या मदतीसाठी शासनाचा प्रतिसादही असून नसल्यासारखाच दिसला. आपत्ती व्यवस्थापन या काळात कुठे दिसलेच नाही. तातडीची मदत तर उशिराच मिळाली, तर नुकसानीचे मोजमापही धड झाले नाही. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तसेच तिचे निवारण व प्रतिबंध यासाठी अधिक व्यापक आणि मूलगामी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. कोकणासारख्या वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशाचा विकास करताना निव्वळ अभियांत्रिकी उपायांचा अवलंब न करता तेथील नैसर्गिक व्यवस्थेला धोका पोहोचणार नाही असे ठोस निकष विकसित करणे, वंचितांवर झालेले परिणाम लक्षात घेऊन त्यांच्या संरक्षणासाठी कायदेशीर तरतूद करणे यासारख्या उपाययोजनाही या अहवालात सुचविण्यात आल्या आहेत.



'प्रयास'चा अहवाल प्रसिद्ध करताना सुरेखा दळवी, राम कवलगी, सचिन वारघडे, वैशाली पाटील.


आपला कोकण

लोकमत मुंबई गुरुवार, दि. २४ नोव्हेंबर २००५ पान : ८


# नैसर्गिक आपत्तीमुळे कोकणवासीयांच्या उपजीविकेची सुरक्षितताच धोक्यात

अलिबाग, दि. २३ (प्रतिनिधी) - कोकण रेल्वे खाणकाम आदींसारखे आधुनिक विकासाच्या नावाने केले जाणारे बाह्यहस्तक्षेप आणि कोकणातील नैसर्गिक परिस्थितीच्या मर्यादा धुडकावून होणारे प्रकल्प यामुळे शेती, मच्छीमारी, जंगलाधारित व्यवसाय या पारंपरिक उपजीविका पद्धतीवर मोठे गंडांतर येत असून नैसर्गिक आपत्तीमुळे कोकणवासीयांच्या उपजीविकेची सुरक्षितताच अनिश्चित काळासाठी धोक्यात आल्याचे पुण्यातील 'प्रयास' संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

जुलै व ऑगस्ट महिन्यातील पूर व अतिवृष्टीने घडविलेले नुकसान आणि त्यांचे विविधांगी परिणाम लोकांच्या दृष्टिकोनातून समजून घेणे व शासनाच्या तत्कालीक, दीर्घकालीन उपाययोजनांबाबत लोकांचे अनुभव व अपेक्षा जाणून घेणे या उद्देशाने 'प्रयास' या स्वयंसेवी संस्थेच्या अभ्यास गटाने पाहणी करून अहवाल तयार केला. आज येथे पत्रकार परिषद घेऊन तो प्रसिद्ध करण्यात आला. हा अहवाल रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, गुहागर व संगमेश्वर या आठ तालुक्यातील ४७ वाड्यांमध्ये केलेल्या क्षेत्र पाहणीवर आधारित आहे.

कोकणासारख्या दुर्गम व नाजूक नैसर्गिक रचना असलेल्या प्रदेशात कोकणच्या विकासासाठी सुरू झालेल्या कोकण रेल्वेचा स्थानिक लोकांना फारसा फायदा झाला नाही. उलट घरांना, जमिनींना भेगा जाणे आदी समस्यांना सामोरे जावे लागल्याचे भिवसरबाग येथील घटनामधून स्पष्ट झाले आहे. फार्महाऊस, कंत्राटी शेती, रिसॉर्ट्स, हॉटेल्स तसेच कारखानदारीच्या नावाखाली शहरी भांडवलदार व श्रीमंत वर्गाकडून कोकणातील जमिनी हस्तगत करण्याचे प्रमाण मोठे आहे. मच्छीमारीमध्ये बड्या व्यावसायिकांमुळे स्थानिक छोट्या मच्छीमारांवर संकट येत आहे. यामुळे प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही कोकणातील बहुसंख्य लोकांपुढे जगण्याचा प्रश्न तीव्र बनला असून येथील अर्थव्यवस्थेलाच धक्का बसल्याचे अहवालात नमूद आहे.

अतिवृष्टी व दरडी कोसळण्यामुळे शेतजमीनीत मोठमोठे दगडधोंडे आणि गाळ यांचा एक-दीड फुटापेक्षा जास्त उंचीचा थर साठला आहे. तेथे बाहेरून यंत्रसामुग्री, आर्थिक मदत मिळाली तरी पुढील अनेक हंगाम जमिनी पूर्वस्थितीत येणार नाहीत. या शेतजमिनींची दुरुस्ती लोकसहभागाशिवाय शक्य नाही, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

भविष्यात गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न उभा राहणार आहे. आधीच अशक्त व रोगट झालेल्या गुरांवर याचा तीव्र परिणाम जाणवेल. पावसाळ्यात जरी पिण्याच्या किंवा शेतीच्या पाण्याची वणवण जाणवत नसली तरीही हिवाळ्याच्या शेवटी याची तीव्र समस्या लोकांसमोर उभी राहील. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची तीव्रता आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल अशा दलितांसाठी अनेक पटींनी वाढल्याचे दिसते. शेतमजुरीअभावी भूमीहीन दलितांच्या उपजीविकेचा प्रश्नही यापुढे तीव्र होणार असल्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

बेसुमार जंगलतोड, रासायनिक कारखाने, पूररेषेत व पात्रात होणारी बांधकामे, झाडेझुडपे व गवताळ प्रदेशात दरवर्षी लागणारे वणवे यातून मानवाने निसर्गावर केलेले बेबंद आक्रमण हे सारे घटक कोकणातील नैसर्गिक आरिष्टाला जबाबदार असल्याचे अहवालात म्हटले आहे. या सर्व बाबींवर 'अहवालात काही उपायही सुचविण्यात आले' आहेत. याबाबत माहिती देताना 'प्रयास'चे राम कवलगी यांनी सांगितले की, अरिष्टाचा शेतीवर मोठा परिणाम झाला आहे. मात्र भातशेतीच्या नुकसानीला अत्यल्प मदत दिली जाते. याबाबतचे सर्वाधिकार कृषी विभागाला देण्यात आले आहेत. कामाची व्याप्ती पाहता मनुष्यबळ कमी पडते. हे लक्षात घेता यात लोकसहभाग महत्त्वाचा आहे.

आपत्कालीन परिस्थितीत जशी कामे होतात तशी व्हायला हवीत. शेतीच्या दुरुस्तीसाठी प्रथम २५ टक्के व नंतर ७५ टक्के रक्कम दिली जाणार आहे. कोकणातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पाहता या कामाचे पैसे आगाऊ दिले जावेत. ही कामे ३१ डिसेंबर २००५पूर्वी पूर्ण करण्याचे शासन आदेश असताना त्या कामाला अद्याप सुरुवात झाल्याचेही दिसत नाही, असेही ते म्हणाले.

## 'प्रयास'च्या अहवालातील मत

स्थानिक लोकांकडे कोकणातील नैसर्गिक, भौगोलिक, सामाजिक परिस्थितीचे ज्ञान आहे. त्याचा वापर करून व्यापक स्वरूपात अभ्यास व्हायला हवा, त्यासाठी लोकसहभाग असलेली खास समिती नेमण्यात यावी. येथे विकासकामे योग्य ते निकष पाळूनच केली जावीत. हानीचे मोजमाप करण्याची यंत्रणा कोकणात नाही. ती उपलब्ध व्हावी. तसेच विकासकामांमुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे, त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज त्यांनी नमूद केली.

आपत्ती विभागाचा अभियांत्रिकी दृष्टिकोनातून विचार होतोय. त्याला नैसर्गिक व वैश्विक विचारांची जोड हवी. राष्ट्रीय पातळीवर नैसर्गिक आपत्ती विधेयक संसदेत येत आहे. याबाबत समाधान व्यक्त करून महाराष्ट्र सरकारनेही असे विधेयक विधिमंडळात आणावे, अशी मागणी त्यांनी केली. या वेळी 'प्रयास'चे सचिन वारघडे, श्रमिक क्रांती संघटनेच्या सुरेखा दळवी, अंकुर ट्रस्टच्या वैशाली पाटील यांनीही विचार मांडले.

# विकासाच्या नावाखाली निसर्गावर आक्रमण भोवले

स्थानिक प्रतिनिधी
अलिबाग, दि. २३

विकास प्रकल्पाच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद आक्रमण आणि त्याकडे प्रकल्प व्यवस्थापन आणि शासनाचे झालेले दुर्लक्ष यामुळेच कोकणात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टीचा आघात सोसावा लागला आणि कधीही भरुन न येण्याजोगी हानी झाली असल्याची माहिती पुणे येथील 'प्रयास' संस्थेचे विश्वस्त राम कवळकी आणि सचिन वारघानी यांनी दिली.

२६ जुलैच्या अतिवृष्टीनंतर कोकणात कोसळलेल्या दरडी, महापुरामुळे झालेले नुकसान याची कारणे शोधण्यासाठी 'प्रयास' संस्थेच्या कार्यकर्त्यांनी या आरिष्टामागील मूळ कारणे, त्याचे दीर्घपल्ली परिणाम व तसेच स्थानिकांच्या दृष्टीतून शासनाचा प्रतिसाद, तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपायाबाबतच्या गरजा व अपेक्षा यांची सर्वंकष मांडणी करणारा एक अहवाल तयार केला आहे. हा अहवाल आज या पत्रकार परिषदेत प्रसिद्ध केला.

२६ जुलैच्या अतिवृष्टीच्या पुराचा फटका मुंबईनंतर संपूर्ण कोकण प्रदेशाला बसला परंतु मुंबईतील आरिष्टाची आणि त्यावरील दीर्घकालीन उपाय योजनांची चर्चा अनेक ठिकाणी व माध्यमांनी झाली असली तरी कोकणातील आरिष्टांबाबतची चर्चा अभावानेच झालेली दिसते असे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. या बरोबर एका बाजूने विकास प्रकल्पांच्या नावाखाली निसर्गावर केलेले बेबंद मानवी आक्रमण (रेल्वे, खाणकाम इ. ) व दुसऱ्या

## अतिवृष्टीवर 'प्रयास'चा अहवाल

बाजूने अतिवृष्टीचा आघात यामुळे मुळातच नाजूक (fragile) जडणघडण असलेल्या कोकणातील निसर्गाच्या व्यवस्थेची (परिसंस्थेची - Ecosystem उदा. डोंगर, नद्या-खाड्या व खाजणे इ. ) कधीही भरुन न येण्याजोगी हानी झाली. या नैसर्गिक व्यवस्थेशी जोडलेली सर्व उपजीविकेची कामे (शेती, पशुपालन, मजुरी व छोटे व्यवसाय इ.) व संसाधनाचे विविध प्रकारे नुकसान होऊन या नैसर्गिक आरिष्टाचे रुपांतर आर्थिक व सामाजिक आरिष्टामध्ये झाले. आदिवासी, दलित, स्त्रिया अशा आर्थिक, राजकीय पातळीवर परिघावर असणाऱ्या



पुणे येथील प्रयास संस्थेने तयार केलेल्या कोकणातील आरिष्टावर उपाय स्थानिकांच्या नजरेतून अहवाल प्रकाशन करताना आदिवासी संघटनेच्या कार्यकर्त्या सुरेखा दळवी, प्रयासचे राम कवळकी, सचिन वारघानी, वैशाली पाटील आदी मान्यवर. (छाया : जितू शिगवण)

समाजघटकांना सर्व स्तरावरुन सोसावा लागलेला अन्याय व यामुळे त्यांच्यासाठी आरिष्टाची तीव्रता अधिकच वाढली. या आरिष्टामुळे अन्न सुरक्षेचा (food security) प्रश्न वंचितासहित सर्व प्रभावित कुटुंबांसाठी गंभीर होणार आहे. परिणामी तीव्र कुपोषण, अनारोग्य याबरोबरच विशेषतः वंचित समाज गटांमध्ये कर्जबाजारीपणा व स्थलांतर यात वाढ झालेली दिसते. यातून होणारे शोषण व असुरक्षितता असे दीर्घकालीन परिणाम या प्रक्रियेत सर्वाधिक दुर्लक्षित राहिले.

शासनाने आरिष्टाला दिलेला प्रतिसाद मात्र अत्यंत अपुरा आणि तात्पुरत्या विचारावरच आधारित होता. आपत्ती व्यवस्थापनाचे स्वतंत्र

पुढील मजकूर पान ६ वर

# विकासाच्या नावाखाली...

(पान १ वरून)

खाते चालवणाऱ्या शासनाने तातडीच्या मदतीचे वाटप तर सोडाच परंतु नुकसानाचे मोजमापही धड केले नाही. आपत्ती निवारण आणि व्यवस्थापन याकरिता तर राज्य शासनाकडे लिखित धोरणही नाही. तसेच आरिष्ट निवारणासाठी तसेच प्रतिबंधासाठी अधिक व्यापक आणि मूलगामी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले असल्याची माहिती श्री. राम कवळकर यांनी दिली. या अहवालात उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. कोकणासारख्या वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशाचा विकास करताना निव्वळ अभियांत्रिकी उपायांचा अवलंब न करता तेथील नैसर्गिक व्यवस्थेला धोका पोहोचणार नाही, असे ठोस व नेमके निकष विकसित करण्याची आवश्यकता आहे. दुसरे म्हणजे या आरिष्टांचे वंचितांवर झालेले परिणाम लक्षात घेऊन त्यांच्या संरक्षणासाठी कायदेशीर तरतुदीही करणे आवश्यक आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

# कोकणातील अरिष्ट; लोकसहभागी उपायांची गरज

## पूरग्रस्त कोकण आणि उपाययोजना-१

समीर जाधव

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अॅन्ड अॅग्रीकल्चर व स्थानिक संस्थेच्यावतीने दोन दिवस चिपळुणात झालेल्या 'पूरग्रस्त कोकण आणि उपाययोजना' या कार्यशाळेत बहुतांशी अभ्यासकांनी पूर नियंत्रणाची गरज या विषयावर भर दिला. त्यामुळे पूर रोखण्यासाठी अनेक मार्ग सुचविण्यात आले.

दोन महिन्यापूर्वी आलेल्या महापूरानंतर येथील व्यापारी संघटनेच्या माध्यमातून भविष्यातील धोका ओळखून पूर नियंत्रणविषयक अभ्यासपूर्ण कार्यशाळा झाली. या कार्यशाळेसाठी नागोठणे, महाड, खेड, पुणे, मुंबई, राजापूर, कणकवली, ठाणे आदी ठिकाणांहून प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पूर प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्यादृष्टीने ही कार्यशाळा पहिले पाऊल ठरली.

पुणे येथील प्रयास संस्थेचे डॉ. सुबोध वागळे यांनी 'कोकणातील अरिष्ट, सर्वसमावेशक लोकसहभागाची आवश्यकता' या आधारे उत्तम विवेचन केले. प्रयास संस्था कोकणात अनेक सामाजिक काम करीत आहे. या अभ्यासातून कोकणातील पूराचे अरिष्ट त्याची कारणे, परिणाम आणि त्यावरील उपाय याविषयी माहिती दिली. कोकणातील आपत्तीचे मूळ नैसर्गिक, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आहे. आज मानव निसर्गावर हल्ला चढवित आहे. समाज व राजकीय क्षेत्रात निसर्गाचे हनन होत आहे. या कारणाने अरिष्टाला तोंड द्यावे लागत आहे. नैसर्गिक संकटाचे रूपांतर पूर व दरडी कोसळणे यासारख्या अरिष्टांमध्ये झाले. नैसर्गिक अरिष्टांचे रूपांतर आर्थिक व सामाजिक अरिष्टामध्ये होते आणि या तीनही अरिष्टांना शासनामार्फत अपुरा आणि संवेदनहीन प्रतिसाद मिळाला, असे वागळे यांनी स्पष्ट केले.

या संकटामागची कारणे अशी आहेत, आज नैसर्गिक चक्रातील प्रक्रियांमध्ये असमतोल निर्माण झाला आहे. नैसर्गिक व्यवस्थेमध्ये मानवाने असमंजस आणि अनिर्बंध हस्तक्षेप केला आहे. या कारणाने स्थानिक नैसर्गिक परिसंस्थेची नाजूक स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तीव्र डोंगरउतार, हंगामी पावसाचे जास्त प्रमाण, जास्त आर्द्रता, कडक उन्हाळा, छोटे आणि सततचे भूकंप, असे नैसर्गिक प्रकोप होत आहेत.

या संकटाच्या पार्श्वभूमीवर नियोजनामध्ये गंभीर दोष आहेत. अभियांत्रिकी व अर्थकारणाचा अवाजवी प्रभाव, नैसर्गिक व्यवस्थेबद्दल असलेले घोर अज्ञान व अनास्था, दिर्घ पल्ल्याच्या आपत्ती प्रतिबंधक नियोजनाचा अभाव, लोकसहभागाचा अभाव ही कारणे अरिष्टाला जबाबदार आहेत. तसेच सरकारी कारभारातील अकार्यक्षमता, बोकाळलेला भ्रष्टाचार, वाढते औदासिन्य व जबाबदारीचा अभाव म्हणून आपद्ग्रस्त परिस्थितीत अनेक समस्या भेडसावत आहेत, असा वागळे यांनी शासनावर ठपका ठेवला.

एखाद्या ठिकाणी पूर, भूकंप किंवा अन्य अरिष्ट कोसळले की, त्या संकटाचे तात्काळ परिणाम भोवताली उमटतात. रेल्वे, रस्ते व इतर पायाभूत सोयींचे नुकसान होते. औद्योगिक आणि व्यापारी आस्थापना आणि कच्च्या, पक्क्या मालाचे नुकसान होते. या संकटात शेतजमीन, पीक व अन्नसाठ्याचे नुकसान होते. स्थानिक अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान आणि स्थानिक रोजगार संधीमध्ये मोठी घट निर्माण होते. याचा प्रत्यय आपल्याला महापूरात आला.

आपत्तीचे तात्काळ होणारे परिणाम तसेच दूरगामी आर्थिक व सामाजिक आघात होतात. यामध्ये अन्नटंचाईमुळे कुपोषण होते. स्त्रिया, वृद्ध आणि मुलांची आरोग्य हानी होते. शेतीवर झालेल्या आघातामुळे शेतकऱ्यांच्या कर्जात वाढ होते. रोजगाराच्या अभावामुळे भूमीहीन, अल्पभूधारक ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतर करतात. या संकटामुळे वंचित घटकांच्या आर्थिक व सामाजिक दैन्यात मोठी वाढ होते. त्यामुळे या लोकांवर दूरगामी परिणाम होतात. मात्र या महासंकटावेळी सर्व बाबतीत सर्वसमावेशक, संवेदनशील व लोकसहभागी उपाययोजनांची गरज आहे. या संकटाला तोंड देताना सरकारी व गैरसरकारी प्रतिसाद सामाजिक व पर्यावरणीयदृष्ट्या असायला हवा; असे मत मांडण्यात आले.

आर्थिकदृष्ट्या सावरताना आपद्ग्रस्तांच्या पायाभूत सुविधांची दुरूस्ती व आपत्ती प्रतिबंधकता करणे जरूरीचे आहे. अन्नटंचाईचा प्रतिकार करताना रेशन व्यवस्थेची पुनर्रचना व मजबुतीकरण होणे आवश्यक आहे. शेतीच्या सुधारणेसाठी रोजगार हमी योजनेची लवचिक व व्यापक अंमलबजावणी व्हायला हवी. आपत्ती प्रतिबंधासाठी राजकीय व प्रशासकीयदृष्ट्या विकासाच्या आखणीपासून ते अंमलबजावणीपर्यंत लोकांच्या अर्थपूर्ण सहभाग आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सर्व शासकीय खात्यांच्या कारभारात खुलेआम लोकसहभागाची गरज आहे. त्यासाठी व्यापारी, अधिकारी, नेते, अभियंते आदींनी समाज रक्षणाची जबाबदारी घ्यायला हवी.

केवळ अभियांत्रिकी उपायांनी अरिष्टांची तीव्रता कमी होणार नाही. त्यासाठी सर्वसमावेशक, संवेदनशील आणि लोकसहभागी उपाययोजनांची प्रामुख्याने गरज आहे, असे वागळे यांनी ठासून सांगितले. त्यांनी लोकसहभागातून पुराचे उपाय सुचविले.